RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी
# शिव वाणी
बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २२ वे | अंक ०८ | सोमवार दि.२४ फेब्रुवारी २०२५ | Mo.9422748792/ 9822628521 | पाने : ४ | किंमत ०३ ₹
Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-22 | Issue -08 | MONDAY DT.24 FEBRUARY 2025 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 3 RUPEES

## दहावीच्या मराठी प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी बदनापूर पोलिसांनी तिघांना केले अटक

जालना ।प्रतिनिधी.

दि.२१ फेब्रुवारी रोजी पासून इयत्ता दहावीच्या परिक्षा सुरु झाल्या असून मराठी विषयाच्या पहिला पेपर दि.२१ रोजी सकाळी ११ वाजता ते दुपारी २ वाजेपर्यंत होता सदर मराठी विषयाच्या प्रश्न पत्रिकेतील काही प्रश्नाची उत्तरे हस्तलिखित व छापील स्वरूपात बदनापूर परिसरातील काही लोकाकडून व्हाट्सअप वर व सोशल मीडिया न्यूज वर प्रसारित होत असल्याने मराठी पेपर चे प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणी शिक्षणाधिकारी व माध्यमिक जिल्हा परिषद जालन याच्या फियादीवरून बदनापूर पोलीस ठाण्यात गु.र.न.५२/२०२५ कलम ७.८ महाराष्ट्र विद्यापीठाच्या मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षामध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध अधिनियम १९८२ सह कलम ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक सुदाम भागवत या संदर्भात मा.पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यानी सदर गुन्हा उघडकीस आणून त्याचे पाळेमुळे शोधून काढण्याबाबत मार्गदर्शन करून सूचना दिल्या. त्या अनुषगाने श्री आनंत कुलकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी जालना हे बदनापूर पोलीस स्टेशने येथे तळ ठोकून होते, सदर गुन्ह्याच्या तपासात पोलिसांनी संशियत आरोपींना ताब्यात घेऊन सखोल तपास करून सीएससी चालक या ताब्यात घेऊन तपासाची चक्र फिरवली असता आतापर्यंत तीन आरोपी अविनाश भगवान अभोरे वय २९ रा. अंबडगाव ता. बदनापुर जि. जालना, कृष्णा अशोक शिरसाठ वय २३ वर्ष रा. वाल्हा ता. बदनापुर जि. जालना अजय संजय निकाळजे वय २३ वर्ष रा. रामखेडा ता.. बदनापुर जि.जालना याच्यावर गुन्हा दाखल करून न्यायालया समोर हजर केले असता त्याना दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनवली आहे.सदर गुन्हा उघडकीस आणून आरोपींना अटक करण्यासाठी श्री अजय कुमार बन्सल पोलीस अधीक्षक जालना, श्री आयुष नोपानी अप्पर पोलीस अधीक्षक जालना, श्री आनंद कुलकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी जालना याच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली पो . नि.सुदाम भागवत, पो . नि.पकज जाधव, स.पो.नि.अविनाश राठोड , स.पो.नि.स्नेहा करेवार, स.फो संतोष सावत, पो. ह. बाबासाहेब जऱ्हाड, रुस्तुम जैवाळ, कैलास खार्डे,पो.का. पुनमसिंग गोलवाल, सचिन राऊत आदींनी उत्तम कामगिरी केली असून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे

# खाजगी विद्यापीठातून विद्यार्थ्यांना आता आरक्षण नाही ?

## शिमग्यापूर्वीच रिझर्वेशनच्या विद्यार्थ्यांवर बोंब मारण्याची वेळ !

बीड / विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्र विधिमंडळाने नुकतेच एक बिल पास केले आहे. यानुसार आता यापुढे खाजगी विद्यापीठातून रिझर्वेशन कोठा बंद करण्याचा आत्मघाती निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार भविष्यात रिझर्वेशनच्या कोणत्याही विद्यार्थ्यांना खाजगी विद्यापीठातून कोणत्याही प्रकारचे वित्तीय सहाय्य, स्कॉलरशिप, फ्रीशिप, शुल्क प्रतिपूर्तीची सवलत मिळणार नाही. त्यामुळे रिझर्वेशनच्या विद्यार्थ्यांवर भविष्यात शिमग्यापूर्वीच शिक्षणासाठी बोंब मारण्याची वेळ येणार आहे. या निर्णयामुळे गोरगरीब होतकरू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधारात जाणार आहे.

महाराष्ट्र सरकारने विधानसभा निवडणुकीमध्ये मतदारांना आपलंसं करण्यासाठी आश्वासनांची खैरात आणि वेगवेगळ्या प्रकारची गाजरे दाखवली. आता या सरकारने खरे खायचे दात दाखवण्यास सुरुवात केली आहे. नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये महाराष्ट्र विधिमंडळाने रिझर्वेशनच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी घातक ठरणारा आत्मघातकी निर्णय पास केला आहे. या पास केलेल्या बिलानुसार यापुढे महाराष्ट्रातील कोणत्याही खाजगी विद्यापीठातून एससी, एसटी,ओबीसी, ईडब्ल्यूएस आदी कोणत्याही प्रकारच्या रिझर्वेशन अंतर्गत विद्यार्थ्यांना कसलाही लाभ मिळणार नाही.या विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप, फ्रीशिप, रिएम्बेसमेंट म्हणजेच राज्यातील स्वयं अर्थसाहिता विद्यापीठामधून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना यापुढे कोणत्याही प्रकारचे वित्तीय सहाय्य, शिष्यवर्ती किंवा शुल्क प्रतिपूर्तीची राज्य शासनाकडे मागणी करण्याचा सुद्धा अधिकार राहणार नाही. अशा प्रकारचे विधयक मंजूर झाल्यामुळे भविष्यात स्वयं अर्थसहायता खाजगी विद्यापीठावर अंतर्गत रिझर्वेशनच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती आणि सर्व शैक्षणिक सवलती बंद होणार आहेत.याचा फटका गोरगरीब वंचित होतकरू विद्यार्थ्यांना लाखोच्या संख्येत होणार आहे. त्यामुळे भविष्यात गोरगरिबांची मुले उच्च शिक्षण शिकू नयेत याची सरकार तरतूद करत आहे का ? असा प्रश्न उभारला गेला आहे.या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधकारमय होणार असल्याने या अन्यायाच्या विरुद्ध रिझर्वेशन अंतर्गत लाभ घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना रस्त्यावर उतरून सरकारच्या विरोधात आक्रमक भूमिका घेणे गरजेचे असणार आहे. अन्यथा भविष्यात रिझर्वेशन अंतर्गत मुले उच्च शिक्षण घेण्याचे केवळ स्वप्न पाहू शकतील प्रत्यक्षात त्यांना उच्च शिक्षणापासून कायमचे वंचित व्हावे लागेल.

### राज्यातील ३० विद्यापीठांचा समावेश..

महाराष्ट्रामध्ये खाजगी स्वयं अर्थसाहिता असलेली ३० विद्यापीठे आहेत.या विद्यापीठाअंतर्गत दरवर्षी रिझर्वेशन अंतर्गत हजारो नव्हे लाखो विद्यार्थी रिझर्वेशनचा फायदा घेतात. या सर्व विद्यार्थ्यांची आता रिझर्वेशन सवलत या विद्यापीठांतर्गत बंद होणार असल्याने त्यांना भविष्यात उच्च शिक्षण घेणे केवळ स्वप्न राहणार आहे.

### वर्षानुवर्ष सुरू असलेली सवलत कशामुळे बंद ?

रिझर्वेशन अंतर्गत असलेल्या गोरगरीब वंचित मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण शिकता यावे यासाठी खाजगी विद्यापीठांतर्गत सुद्धा आरक्षण लागू करण्यात आलेले होते. रिझर्वेशन अंतर्गत या विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सवलती मिळत होत्या. अस असताना सरकारने रिझर्वेशन च्या विद्यार्थ्यांसाठी आत्मघाती निर्णय का घेतला. यासंदर्भात सरकारला जाब विचारणे काळाची गरज होणार आहे.

### न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरावे लागेल...

रिझर्वेशन अंतर्गत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना आपले शैक्षणिक आयुष्य अंधकारमय होऊ नये यासाठी या निर्णयाविरुद्ध आपल्या पाल्यांना सोबत घेऊन जन आंदोलन करावे लागेल.

रस्त्यावर उतरावे लागेल, तेव्हा जर या सरकारला जाग आली तरच गोरगरिबांचे शिक्षण वाचेल.

### शिक्षण पैश्या वाल्यांचा खेळ होईल..

शासनाने गोरगरीब वंचित होतकरू रिझर्वेशनच्या विद्यार्थ्यांवर जर रिझर्वेशन बंद करण्याचा निर्णय लादला तर शैक्षणिक आरक्षणासाठी ज्या ज्या समाजाने टोकाची भूमिका घेत आंदोलने सुरू केलेली आहेत. त्याला कसलाही अर्थ उरणार नाही. आणि भविष्यात ज्यांच्या खिशात पैसे आहेत अश्या पैशावाल्यांसाठी शिक्षणाची दारे खुले राहतील आणि जे विद्यार्थी खऱ्या अर्थाने होतकरू आहेत त्यांना केवळ पैशाअभावी शिक्षणापासून वंचित रहावे लागेल.

# महाशिवरात्री ; वैद्यनाथ मंदिर भाविकांच्या सेवेसाठी सज्ज




**परळी / प्रतिनिधी**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी महाशिवरात्री यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहाने संपन्न होत आहे. यानिमित्त सर्वात महत्वाचे म्हणजे 'श्री' जीं चे दर्शन दर्शनार्थी सर्व भाविकांना दर्शन सुलभ व्हावे 'श्री' चे पावित्र्य व मंदिराचे मांगल्य राखले जावे, गर्दीचे नियमन व्हावे यासाठी सर्वतोपरी काळजी घेण्यात आली आहे. धर्म दर्शनेच्छूक भाविकांच्या पुरूष व महिला अशा दोन वेगळ्या रांगा राहतील. तसेच बाहेर जाण्याचा मार्ग वेगळा राहील. त्याचप्रमाणे प्रवेश पत्रिका (पास) ची सोय करण्यात आली आहे. प्रवेश पत्रिकेचे मूल्य रूपये १००/- असून प्रवेश पत्रिकाधारकांच्या रांगेत उभे राहूनच दर्शनाचा लाभ घ्यावा. दि.२५/०२/२०२५ मंगळवार रात्री १२.०० वा. पासून ते २६/०२/२०२५ बुधवार रात्री १२.०० वाजेपर्यंत दर्शन घेता येईल. दर्शनासाठी घाई करता येणार नाही. दर्शन पास (प्रवेश पत्रिका) विक्रीची सोय वैद्यनाथ बँक शाखा: परळी वैजनाथ ने मंदिर परिसरात उभारलेल्या स्टॉलमध्ये केली आहे. शिवाय शहरातील स्टेट बँक ऑफ

(उर्वरीत पान २ वर)



# माजी आमदार अँड.उषाताई दराडे यांच्याकडून निवड झालेल्या पत्रकारांचा सन्मान

बालाजी तोंडे, शेख रिजवान, दिपक जाधव,प्रशांत लव्हुरीकर आणि अबू बकर सन्मानित

**बीड ।प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या माजी आमदार अँड. उषाताई दराडे यांनी पत्रकारांच्या निवडीबद्दल आणि वर्धापन दिनानिमित्त संपादक यांना आपल्या निवासस्थानी शाल पुष्पगुच्छ देऊन कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा देत ज्येष्ठ विधीज्ञ अँड. मोतीराम दराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानित केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूर कर यांनी पत्रकार संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी दैनिक समर्थ लोकनेताचे संपादक बालाजी तोंडे आणि दिव्य आधारचे संपादक शेख रिजवान तसेच डिजिटल मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी दिपक जाधव आणि बीड जिल्हा उपाध्यक्षपदी ब्रम्हवृंदचे संपादक प्रशांत लव्हुरीकर यांची निवड झाल्याबद्दल तर दैनिक दिव्य वार्ताचे

(उर्वरीत पान २ वर)



### पत्रकार संघाच्या प्रदेश संपर्कप्रमुखपदी वैभव स्वामी यांची निवड झाल्याबद्दल अँड.उषाताई दराडे यांच्याकडून सन्मानित

**बीड ।प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे साहेब यांनी पत्रकार संघाच्या प्रदेश संपर्क प्रमुख पदी बीड येथील दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांची निवड करून राज्याची मोठी जबाबदारी

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777



# संपादकीय

## उत्सुकतेने सगळेच झोपले

सांप्रतकाळात अभिजात वगैरे दर्जाचा दुरभिमान पोसणाऱ्या मराठी 'साहित्याची भूमी' कोणत्या स्थितीत, याचे उत्तर तीन पिढ्यांच्या वाचन- संसारातल्या किंवा वाचन-काडीमोडानंतरच्या व्यवहारांवरून शोधावे लागेल. १९८१ ते ९६ पर्यंत वाचनकक्षेच्या साधारण वयात आलेली 'मिलेनियल' पिढी, १९९७ ते २०१२ पर्यंत जन्मलेली 'जेन झी' पिढी आणि २०१० ते २०२४ या काळात भूतळावर कोसळलेली 'अल्फा' पिढी. त्या आधीच्या 'जेन एक्स' अथवा साठोत्तरीत बंडखोरीचे झेंडे फडकावणारी 'बूमर्स' या पिढीतील तथाकथित मुरब्बी उरलेत फक्त पुरस्कार घेऊन क्षीण नाचण्यासाठी आणि क्षणसाजऱ्या कौतुकासाठी. तर याआधीच्या दोन पिढ्यांना व्यवधाने नव्हती; त्याच्या शतपटींत नंतर वाढली. पुढल्या पिढ्यांना उपग्रह वाहिन्या आल्यानंतरच्या द्रुतगतीने धावणाऱ्या क्रांत्यांमध्ये जगाशी अद्यायावत राहत संगणकाच्या सतत विकसित होत राहणाऱ्या आवृत्त्यांशी एकरूप होताना, माहितीच्या स्फोटांमध्ये मेंदूत आधी असलेल्या तपशिलांना राखत बुद्धीशकले होण्यापासून स्वत:ला सावरताना आणि समाजमाध्यमांची व्यसननशा अंगभर भिनूनदेखील सुखात जगताना किती तारेवरची कसरत करावी लागली याची जाणीवदेखील 'जेन एक्स' किंवा 'बूमर्स'ना असू शकत नाही. तर या अजस्रा पसाऱ्यात त्यांच्याकडून ग्रंथोत्तेजनाची अपेक्षा करणे किती अवघड गोष्ट, हेदेखील उमजू शकत नाही. या पिढ्या ई-मेल्स, इन्स्टापोस्ट, व्हॉट्सॲप पिंग्ज आणि या विद्यापीठात फॉरवर्डींनी पसरविलेले उपयोजित प्रबंध डोळे दुखेस्तोवर वाचतात. रील्स-व्हिडीओ न्याहाळत त्यांचे तासचे तास निष्प्रभ होतात. 'ट्रेण्ड'च्या नावाखाली महापुरुषाची जयंती आपापल्या वाहनाला झेंडा लावून साजरी करण्यात त्यांना धन्यता वाटते. शुक्रवारी थिएटरमध्ये रक्त खवळून काढणारा वगैरे सिनेमा पाहून झाल्यावर 'छावा' कादंबरीच्या तीन-चारशे प्रती त्यांच्याकडून खरेदी केल्या जाऊ शकतात. 'साहित्याच्या भूमी'तल्या नापिकीचीच ही वेळ कधीपासून आली?

साहित्याच्या सकस भूमीचा ऱ्हास होण्याचा प्रकार 'मिलेनियल' पिढी रांगण्यास आरंभ करीत होती तेव्हापासूनच सुरू झाला, असे म्हणावे लागेल. श्री.पु. भागवतांनी ऑगस्ट १९८२ मध्ये 'सत्यकथा' मासिकाच्या शेवटच्या अंकात दिलेल्या निवेदनात म्हटले की 'आज घटकेला सत्यकथेच्या दरमहा १,८७५ प्रती काढण्यात येतात. त्यांपैकी १,२६८ वर्गणीदार, ३४५-५० विक्रेत्यांकडे किरकोळ खपणाऱ्या व २२० भेटीदाखल जाणाऱ्या असतात. दिवाळी अंकांची संख्या ४,२५० असते. या सर्व प्रतींचा एकूण मुद्रणखर्च, संपादकीय व व्यवस्थापकीय सहकाऱ्यांचे पगार, कार्यालयीन इतर खर्च, लेखक-कलावंतांचे मानधन, टपालहशील व तत्सम खर्च मिळून वर्षाला एकूण खर्च प्रत्यक्षाप्रत्यक्ष ९९,४७५ रुपये इतका होतो. वर्गणी, किरकोळ विक्री व जाहिराती मिळून एकूण उत्पन्न ५३,८५० रुपये इतका होतो. या वर्षी सत्यकथेचा निव्वळ तोटा ४५ हजार ६२५ इतका आहे. याचा अर्थ असा की, सत्यकथेचा प्रत्येक महिन्याचा अंक सुमारे पावणेचार हजार रुपये नुकसान सोसून काढला जातो'!

हे मासिक मराठी भाषेच्या समृद्धीसाठी, लोकांत साहित्याभिरुचीची जडण-घडण व्हावी यासाठी तोटा सोसून कित्येक दशके निघत होते. या परमोच्च स्थानी मानल्या जाणाऱ्या मासिकाची ही दु:स्थिती, तर पुढल्या क्रांत्यांत ढेपाळत गेलेल्या मासिक-साप्ताहिकांची काय परिस्थिती असणार? आज भाषेला अभिजात दर्जा आहे; पण अस्तित्वासाठी झगडणाऱ्या पण हाताच्या बोटांवर मोजता येणाऱ्या मासिकांना तगण्याइतपत 'प्राणवायू' लाभेल काय, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. कारण अभिजात दर्जा मिळविणाऱ्या मल्याळममध्ये वर्गणीदारांनी जपलेली २३ च्या वर बालमासिके आहेत. तिसाहून अधिक साहित्यिक नियतकालिके आहेत. तमीळमध्ये दीड डझन साहित्यिक नियतकालिके, तर डझनभर बालमासिके आहेत. तेलुगूमध्ये देखील हीच परिस्थिती आहे. या भाषांची मुद्रित साहित्य वाचनाची भूक अधिक त्यांच्याच चित्रपटगोष्टी सध्या संपूर्ण भारतात तिकीटबारीवर गल्लाभरू ठरत आहेत, हादेखील योगायोग म्हणावा काय? या पार्श्वभूमीवर आपण कुठे आहोत, याची सांख्यिक गरिबी खिन्न करणारी नाही काय?

# समीर शेख राज्यस्तरीय मौलाना अबुल कलाम आझाद समाज सेवा पुरस्काराने सन्मानित

**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील समीर शेख यांनी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असल्यामुळे तसेच त्यासोबतच दांडगा राजकिय संपर्क असलेले व पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य गोरगरिबांचा आवाज न्यायव्यवस्थेपर्यंत पोहचवत असणारे, प्रश्न मार्गी लावणारे, विविध सामाजिक उपक्रम घेऊन सर्वधर्मसमभाव संदेश देणारे, सर्व धर्मातील लोकांना सोबत घेऊन काम करत आहेत. सामाजिक कार्यकर्ते, सुरेश (आण्णा) धस यांचे स्वीय सहाय्यक समीर बादशहा शेख यांच्या सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्यची दखल घेत सन २०२४ - २५ या वर्षाचा राज्यस्तरीय मौलाना अबुल कलाम आझाद समाज सेवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या अगोदर सन २०२२ - २३ मध्ये यशवंतरत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले होते. दैनिक दिव्य वार्ता आणि साप्ता. कश्मकशच्या चौदाव्या वर्धापन दिनानिमित्त गोरगरीब महिलांना शिलाई मशीन व गोरगरीब विद्यार्थ्यांना सायकल वाटप तसेच समाजातील विविध घटकांतील नागरीकांनसाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी वक्फ बोर्डाचे चेअरमन मा. समीर काजी, विधान परिषदेचे आमदार मा. इद्रीश नाईकवडी, मा. आ. सिराज देशमुख, मा. आ. राजेंद्र जगताप,



शफीक भाऊ, भाजपा अल्पसंख्याक मोर्चा जिल्हाध्यक्ष मा. सलीम जहांगीर, यशराज पंडित, दैनिक दिव्या वार्ता/साप्ता. कश्मकश चे संपादक अबुबकर चाऊस, लोकशा संपादक विजय बंब, लोकप्रभा संपादक संतोष मानुरकर, दैनिक वास्तव संपादक जितेंद्र सिरसाठ, सिटीजन कार्यकारी कार्यकारी संपादक चंदन पठाण, लोकमित्रचे संपादक हमीदखान पठाण, कासम शेख, जावेद शेख, सोमीनाथ कोल्हे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे विविध क्षेत्रातून समीर शेख यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# महाराष्ट्र पत्रकार संघाच्या तालुकाध्यक्षपदी परमेश्वर राऊत

**धारूर (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने नुकत्याच जिल्ह्यातील तालुका पत्रकार संघाच्या तालुका अध्यक्ष यांच्या नियुक्ती जाहीर केल्या आहेत . यामध्ये धारूर तालुका अध्यक्षपदी परमेश्वर राऊत यांची नियुक्ती केली आहे .त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होतात आहे .



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात तसेच तालुक्यात कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे . कार्यरत असलेल्या पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली धारूर येथील पत्रकार परमेश्वर राऊत यांची तालुकाध्यक्षांची नियुक्ती जाहीर केली आहे . राऊत यांच्या निवडीमुळे त्यांचे तालुक्यात सर्वत्र अभिनंदन होत आहे

# संकल्प विद्या मंदिर शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणातून करतेय समाजबांधणी – डॉ.विठ्ठलराव लहाने

## संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या 'सुवर्णरत्न' पुरस्काराने शिवकुमार निर्मळे, वृक्षमित्र सुधाकर देशमुख, वर्षाताई मुंडे आणि विद्याधर पंडित सन्मानित

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

येथील संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणा-या 'सुवर्णरत्न' पुरस्कारांचे वितरण यावर्षी शनिवार, दि.२२ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले. यावर्षी हे पुरस्कार शिवकुमार निर्मळे (पत्रकारिता), वृक्षमित्र सुधाकर देशमुख (सामाजिक), वर्षाताई मुंडे (शिक्षण) आणि विद्याधर पंडित (कला) यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.

शनिवारी आद्यकवी मुकूंदराज सांस्कृतिक सभागृहात पुरस्कार वितरणाचा अत्यंत दिमाखदार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी बोलताना डॉ.विठ्ठलराव लहाने म्हणाले की, अंबाजोगाई शहर हे सकारात्मक ऊर्जेचा स्रोत आहे. माझे शिक्षण या शहरात झाले आहे. संकल्प विद्या मंदिर शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी सभागृहात उपस्थित पालकांची गर्दी पाहून लक्षात येते की, शिक्षण क्षेत्रात चोले दांम्पत्य हे अत्यंत तळमळीने कार्य करीत आहे. असे सांगून त्यांनी पालकांनो आपल्या घरात शैक्षणिक वातावरण निर्माण करा. विद्यार्थ्यांना कष्टाची, स्वयं अभ्यासाची सवय लावा, त्यांच्यात प्रामाणिकपणा पेरा, इमानदारी शिकवा. त्यांच्यातील जिद्द, चिकाटी, कष्ट, मेहनत या गुणांना प्रोत्साहन द्या. घरातील टि.व्ही.बंद करा, मुलांना मोबाईल पासून दूर ठेवा. त्यांच्यात शिक्षणाविषयी आवड निर्माण करा. आपल्या मुलांसाठी, कुटुंबासाठी वेळ द्या, कुटुंबात परस्परात संवाद, समन्वय ठेवा, स्नेहबंध वाढवा, आपसांत भांडणे करू नका. घराचे घरपण कायम ठेवा. दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संकल्प विद्या मंदिर शाळेचा भविष्यात वटवृक्ष व्हावा अशा शुभेच्छा डॉ.लहाने यांनी दिल्या. उद्घाटक म्हणून बोलताना डॉ.नरेंद्र काळे म्हणाले की, अंबाजोगाई हे शिक्षणाचे माहेरघर आहे. जेवढा शिक्षक चांगला, तेवढी शाळा चांगली. चांगल्या शिक्षकांवरच शाळेचे यश अवलंबून असते. शाळेचा मालक हा संस्थाचालक व शिक्षक असल्यानेच त्यांच्या दूरदृष्टी व सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे संकल्प विद्या मंदिर शाळेने अल्पावधीत शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शाळा अशी स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. आज शाळा चालविणे व विद्यार्थी मिळविणे ही अवघड बाब आहे. तशाही परिस्थितीत विविध उपक्रम राबवून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे काम संकल्प विद्या मंदिर शाळा करीत आहे. अंबाजोगाईच्या शैक्षणिक परंपरेला ते पुढे नेत आहेत असे डॉ.काळे म्हणाले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण व मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ.विठ्ठलराव लहाने (लातूर) हे होते. तर उद्घाटक म्हणून डॉ.नरेंद्र काळे (सचिव, बनेश्वर शिक्षण संस्था) हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय गंभीरे (माजी नगरसेवक, न.प.अंबाजोगाई) तर प्रमुख अतिथी म्हणून शेख चाँद (गटशिक्षणाधिकारी, अंबाजोगाई), अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे (कृषी महाविद्यालय, लातूर), ॲड.राजेंद्रप्रसाद धायगुडे, संकल्प विद्या प्रतिष्ठानचे सचिव प्रा.कैलास चोले,



मुख्याध्यापिका रेखाताई बडे हे मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी वृक्षमित्र सुधाकर देशमुख (समाजसेवा), शिवकुमार निर्मळे (पत्रकारिता), वर्षाताई मुंडे (शिक्षण) आणि प्रख्यात चित्रकार विद्याधर पंडित (कला) या मान्यवरांना त्यांनी त्यांच्या क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल 'सुवर्णरत्न पुरस्कार-२०२५' देवून सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, फेटा, श्रीफळ, पुष्पहार व पुष्पगुच्छ असे होते. सत्कारमूर्तीनी आपले मनोगत व्यक्त केले. तर अध्यक्षीय समारोप सामाजिक कार्यकर्ते संजय गंभीरे यांनी केला. तर प्रारंभी कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रगीताने करण्यात आली. दीपप्रज्ज्वलनानंतर नारळ वाढवून ग्रामदेवता माता श्री योगेश्वरी देवीचे प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागतपर गीत सादर केले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थितांना शाळेच्या प्रगतीचा चढता आलेख मांडणारा माहितीपट दाखविण्यात आला. प्रास्ताविक विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापिका रेखाताई बडे यांनी केले. तर यावेळी स्कॉलरशिप करीता पात्र ठरलेल्या प्रगती सुधाकर केंद्रे, आरोही उत्तरेश्वर बनाळे, श्रावणी ओमप्रकाश कांगणे, सानिध्या ओंकार स्वामी, पृथ्वीराज तात्याराव निकम, प्रतीक कैलास जाधव या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. त्यानंतर शाळेच्या विविध विभागप्रमुखांचा यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते शेख मुख्तार यांच्याकडून संकल्प विद्या प्रतिष्ठानचे सचिव प्रा.कैलास चोले आणि मुख्याध्यापिका रेखाताई बडे यांचा सत्कार करण्यात आला. सोबतच संकल्प विद्या मंदिर शाळेच्या स्नेहसंमेलनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम ही आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी तब्बल ३१ विविध लोकप्रिय हिंदी आणि मराठी गीत प्रकारांतून आपला बहारदार कलाविष्कार सादर केला. आणि उपस्थित मान्यवर, पालक वर्गाची वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्रिया नायक यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सांस्कृतिक विभागप्रमुख श्रीमती प्रिया घाडगे यांनी मानले. या पुरस्कार वितरण सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संकल्प विद्या प्रतिष्ठानचे सचिव प्रा.कैलास भागवत चोले, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती रेखा सुभाष बडे, सांस्कृतिक विभागप्रमुख श्रीमती अनिता कुलकर्णी, श्रीमती प्रिया घाडगे व संकल्प परिवाराच्या वतीने पुढाकार घेण्यात आला. यावेळी राजकीय, सामाजिक, शिक्षण, विधी, पत्रकारीता, उद्योग, क्रीडा, कृषी, सांस्कृतिक, साहित्य, कला आणि संगीत क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. तर आद्यकवी मुकूंदराज सांस्कृतिक सभागृह पालकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने तुडुंब भरले होते. वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता झाली.

पान १ वरून...

**महाशिवरात्री ;..**

इंडिया (टॉवर), स्टेट बँक ऑफ इंडिया (गांधी मार्केट), आयडीबीआय बँक, महाराष्ट्र बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, दीनदयाळ बँक, वैद्यनाथ बँकेच्या शाखेतही दर्शन पास विक्रीची व्यवस्था भाविकांच्या सोयीसाठी करण्यात आली आहे.

महोत्सवातील विशेष कार्यक्रम

बुधवार, दि.२६/०२/२०२५ रोजी रात्रौ ६ ते ८ पर्यंत देवस्थान विश्वस्त कमेटीतर्फे मा. जिल्हाधिकारी, बीड यांच्या शुभहस्ते 'श्री' जींस रूद्राभिषेक करण्यात येईल. या अभिषेकानंतरच भाविकांना अभिषेकास परवानगी देण्यात येईल. अभिषेकासाठी एका आवर्तनास एकास २००/- रूपये आणि सपत्नीक ३००/- रूपये पडतील. कार्यालयातून पावती घेतल्यानंतरच अभिषेक करता येईल. वार्षिक अभिषेक करणाऱ्यांनी देखील महाशिवरात्र अभिषेकाची वेगळी पावती घ्यावी लागेल. दर्शन पासच्या रांगेतून जाण्यासाठी १०० रुपयांचा दर्शन पास घेणे बंधनकारक आहे.

परळी परिसरातील शिवभक्तांसाठी विशेष दर्शन व्यवस्था

माजी सैनिकांसह परळी वैजनाथ परिसरातील शिवभक्तांसाठी दर्शन पासच्या रांगेतून विनामूल्य दर्शनाची व्यवस्था दि.२६/०२/२०२५ बुधवार रात्रौ १०.०० वा. पासून रात्रौ १२.०० वा. पर्यंत (मंदिर बंद होईपर्यंत) करण्यात आली आहे. पासच्या रांगेतून स्वत:चे ओळखपत्र उदा. आधार कार्ड, मतदान कार्ड, पॅन कार्ड इ. दाखऊनच माजी सैनिक व परळी परिसरातील शिवभक्तांना दर्शन घेता येईल. या व्यवस्थेचा लाभ घ्यावा.

भक्तीगीत गायन

शुक्रवार, दि.२८/०२/२०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता 'श्री'जीं ची पालखी सवाद्य मिरवणुकीने निघेल. सायं. ६ वा. देशमुखपाराजवळ (श्री वैजनाथ मंदिर परिसर) प्रसिद्ध गायिका चैत्राली अभ्यंकर (पुणे) यांचा भक्तीगीत व अभंगवाणीचा कार्यक्रम होईल. अंबेवेस येथे रात्रौ ९ वा. शोभेची दारू उडविण्यात येईल. त्यानंतर गणेशपार, नांदूरवेस व गोपनपाळे गल्ली येथे कलावंतांची हजेरी होईल. नंतर अंबेवेस, भोई गल्ली मार्गे रात्री मिरवणुकीने पालखी मंदिरात परत येईल. याचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा व पालखी सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे ही विनंती. दिनांक ०१/०३/२०२५ शनिवार रोजी सकाळी १० ते १ पर्यंत मानाची बिदागी वाटपाचा कार्यक्रम होईल.

**माजी आमदार..**

संपादक अबू बकर हे आपल्या वर्धापन दिनानिमित्त सातत्याने सामाजिक उपक्रमातून गरजवंतांना सहकार्य करत असल्याने या सर्वांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माजी आमदार ॲड उषाताई दराडे यांनी आपल्या निवासस्थानी शाल पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.यावेळी ज्येष्ठ विधीज्ञ ॲड मोतीराम दराडे यांची विशेष उपस्थिती होती. त्याचबरोबर पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख तथा दैनिक समर्थ राजयोग संपादक वैभव स्वामी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मंगल जगताप, राणी शेख, किरण जोगदंड आदींची प्रमुख उपस्थिती होती..

**पत्रकार संघाच्या प्रदेश ..**

दिली. याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या माजी आमदार ॲड उषाताई दराडे यांनी शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करत पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी जेष्ठ विधीज्ञ ॲड मोतीरामजी दराडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मंगलताई जगताप, राणी शेख, किरण जोगदंड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# इतर राजकीय नेत्यांना अडचणीत आणणारे आ.सुरेश धस स्वत:च अडचणीत सापडले?

**आष्टीचे आमदार सुरेश धसांना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते मेहबूब शेख यांनी आव्हान दिले आहे. औरंगबाद खंडपीठात मेहबूब शेख यांनी याचिका दाखल करत धसांच्या निवडीवर आक्षेप नोंदवला आहे.**

इतर राजकीय नेत्यांना अडचणीत आणणारा भाजपचा बडा नेता स्वत:च अडचणीत सापडला? आमदारकी धोक्यात? इतर राजकीय नेत्यांना अडचणीत आणणारे सुरेश धस स्वत:च अडचणीत सापडले आहेत.. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते मेहबूब शेख यांनी धसांच्या निवडीला औरंगाबाद खंडपीठात आव्हान दिले आहे. दरम्यान यानंतर न्यायालयानं सुरेश धस आणि निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे. यामुळे सुरेश धस यांची आमदारकी धोक्यात आली आहे.

आष्टी मतदारसंघात सुरेश धस यांच्याविरोधात अपक्ष भिमराव धोंडे आणि राष्ट्रवादी पवार गटाचे मेहबूब शेख यांनी निवडणूक लढवली होती. निवडणुकीत सुरेश धस यांना १ लाख ४० हजार ५०७ मतं मिळाली तर भिमराव धोंडेंना ६२ हजार ५३२ आणि मेहबूब शेख यांना ५२ हजार ७३८ मतं मिळाली होती. या निवडणुकीत सुरेश धस यांचा ७७ हजार ९७५ मतांनी विजय झाला होता. विधानसभा निवडणुकीत आष्टी मतदारसंघातून भाजपचे सुरेश धस आमदार म्हणून निवडूण आले.



मेहबूब शेख यांनी याचिका दाखल करत धसांच्या निवडीवर आक्षेप नोंदवला आहे. सुरेश धस यांनी निवडणुकीत धार्मिक कारणांवरुन मतं मागितली, मतदानाच्या दिवशी मतदानाचे व्हिडीओ व्हायरल केले, शासकीय कर्मचाऱ्यांवर दबाब टाकून मतदान करुन घेतलं, ईव्हीएम मशिनबाबतची सुरक्षा संशयास्पद होती. निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी ईव्हीएम मशिनवरील सीलवर स्वाक्षरी केली नाही असे गंभीर आरोप मेहबूब शेख यांनी याचिकेत केले आहेत. न्यायालयानं सुरेश धस आणि निवडणूक आयोगाला नोटीस पाठवली आहे. दरम्यान या प्रकरणी पुढील सुनावणी ५ मार्चला असून न्यायालय काय निर्णय देणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

# सिरसाळा भूषण पुरस्कार २०२५ साठी १० मार्च पर्यंत प्रवेशिका पाठवण्याचे संस्थेचे अध्यक्ष जनक उबाळे यांचे आवाहन

**केज/प्रतिनिधी**

सिरसाळा येथील जनकल्याण शैक्षणिक सेवाभावी संस्था,यशराज पब्लिक स्कुलच्या वतीने दि.२२ मार्च २०२५ रोजी सिरसाळा भूषणपुरस्कार २०२५ देण्यात येणार असून या पुरस्कारासाठी दि.१० मार्च २०२५ पर्यंत प्रवेशिका पाठवण्याचे आवाहन श्री.जनक साहेबराव उबाळे अध्यक्ष, जनकल्याण बहुउद्देशिय सेवाभावी संस्था वाघाळा यांनी केले आहे.

सिरसाळा व पंचक्रोशीत सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय व अतुलनीय निस्वार्थी भरीवपणें कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन मागील काही वर्षा पासून जनकल्याण बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था वाघाळा व यशराज पब्लिक स्कुल च्या वतीने सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक, सेवा,आरोग्य सेवा, राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस सिरसाळा भूषण पुरस्कार देण्यात येत असून या वर्षी देण्यात येणाऱ्या सिरसाळा भूषण पुरस्कार २०२५ साठी संस्थेच्या वतीने प्रवेशिका मागवण्यात येत असूनसामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,सेवा, आरोग्य सेवा,राजकीय, पत्रकारिता,कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दि.२२ मार्च २०२५ रोजी सिरसाळा भूषणपुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात येणार असून या पुरस्कारासाठी दि.१० मार्च २०२५ पर्यंत आपल्या प्रवेशिका यशराज पब्लिक



स्कूल सिरसाळा या पत्त्यावर पाठवाव्या असे आवाहन श्री.जनक साहेबराव उबाळे अध्यक्ष जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था वाघाळा व अध्यक्ष सिरसाळा भूषण पुरस्कार २०२५ निवड समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीडसागवी येथे शिव महोत्सव उत्साहात साजरा केला आहे

**पाटोदा (प्रतिनिधी)**

आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागातील शिवभ क्तनी शिव महोत्सव आयोजित करण्यात आला आहे बीडसागवी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मधे शिवाजी महाराज जयंती आयोजन केले आहे. आमदार श्री सुरेश धस आणा यांचे चिरंजीव मा सागर आपा धस यांनी अखंड महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार व नारळ वाहून प्रतिमेचे पूजन केले आहे यावेळी उपस्थित ह.भ.प. ज्ञानेश्वर ह.भ.प बापु महाराज ह. भ. प जालीदर नरवडे महाराज ह. भ. प बाबासाहेब नरवडे ह. भ. प ज्ञानेश्वर भवर महाराज सेवा सोसायटी चेअरमन सुभाष तात्या गणगे बीडसागवी सरपंच नंदकिशोर कराडे उपसरपंच सोमनाथ घुले युवा नेते सपत ढोबळे माजी सरपंच बबनराव




कराडे माजी उपसरपंच सदिप कराडे आमदार श्री सुरेश धस आणा यांचे स्वीय सहाय्यक विकास तात्या साळवे ग्रामपंचायत सदस्य गणेश नरवडे ग्रामपंचायत सदस्य दादासाहेब साळवे ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ करडुळे ग्रामपंचायत सदस्य प्रशांत घुमरे कृष्ण पाणतावणे विठ्ठल नरवडे संतोष शेठ नरवडे ललेश नरवडे विजय डुकरे समाजसेवक महादेव चव्हाण बजरंग कराडे जिल्हा परिषद शाळा मुख्याध्यापक कसरे सर गणेश कराडे विजय धनवे शहादेव चव्हाण संतोष घुले किरण पारिख आणा गणगे वैभव सोनवणे अनिल सोनवणे पपु दिवटे कांतीलाल दिवटे दिपक कासवा ह.भ प. बापु महाराज नरवडे कल्याण मोहकर बबलु ढोबळे अर्जुन नरोडे विठ्ठल जाधव नामदेव जाधव मच्छिंद्र घुले अवधूत पंडित यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची गावमध्ये भव्य मिरवणूक काढण्यात आली आहे या कार्यक्रमाचे आयोजकनी मा. सागर आपा धस यांच्या सन्मान केला आहे. सुत्रसंचालन नामदेव नरवडे व आभार कृष्णा पाणतावणे मानले आहे

# संत गाडगेबाबांनी स्वच्छतेतून समृद्धीकडे तर संत रविदासांनी

## संसारातून परमार्थाचा मार्ग दाखविला – वसुदेव बप्पा गायकवाड

**केज/प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड येथे दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी संत गाडगेबाबा व संत रविदास यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,माजी प्राचार्य,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते,व्याख्याते वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.उत्स्फुर्त भाषण कृष्णा गिरी,ऋषीकेश कोळसे,यश गायकवाड यांनी केले.अध्यक्षीय




समारोप करताना संत गाडगेबाबांनी स्वच्छतेतून समृद्धीकडे तर संत रविदास यांनी संसारातून परमार्थाकडे जाण्याचा मार्ग दाखविल्याचे प्रतिपादन वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शन आनंद भैय्या गायकवाड यांनी मानले.

# केज पंचायत समिती मध्ये पंतप्रधान आवास योजना ग्रामीण टप्पा ०२ चे मंजुरी पत्र व पहिला हप्ता वाटप

**केज/प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांचा महत्वकांक्षी प्रकल्प सामान्य बेघर लोकांना नवीन घर हा संकल्प शनीवारी पूर्ण झाला.महाराष्ट्रातील वीस लाख निराधारांना एकाच वेळी घर देण्याचे स्वप्न शनीवारी काल पूर्ण झाले. दि.२२ फेब्रुवारी २०२५ रोजी महाराष्ट्रात एकाच वेळी सर्व ग्रामपंचायत, पंचायत समिती,जिल्हा परिषदच्या सर्व कार्यालया मध्ये दहा लाख लाभार्थींना पंतप्रधान आवास योजनेचा पहिला हप्ता त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,ग्रामविकास मंत्री जयदीप गोरे यांच्या उपस्थितीत बालेवाडीपुणे येथे पार पडला.एकाच वेळी दहा लाख लाभार्थ्यांना डीबीटी प्रणालीद्वारे त्यांच्या खात्यात पैसे टाकण्यात आले.अशा प्रकारचा इतिहासात नोंद राहील असा कार्यक्रम हा पहिल्यांदाच महाराष्ट्रात घेण्यात आला.ग्रामीण भागातील दुसऱ्या टप्प्याच्या या कार्यक्रमात उर्वरित दहा लाखलोकांना पण लवकरच निधी वितरित करण्यात येणार आहे.तसेच जे लोक या यादीत नाहीत त्यांचा पण पुन्हा सर्वे लवकरच करण्यात येणार आहे असे पंतप्रधान कार्यालया ने कळवले आहे.शंभर दिवसाच्या या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करून तालुक्यातील ४७१६ लाभार्थ्यांना निधी देण्याचे काम केज पंचायतसमिती ने केले असून त्यांच्या या कामाचे कौतुक करण्यात आले.केजच्या गटविकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने मॅडम,अतिरिक्त गटविकास अधिकारी श्री. राठोड यांनी उत्कृष्ट नियोजन करून १५० ते २०० लाभार्थींना प्राथमिक स्वरूपात मंजुरी पत्र देण्यात आले. या कार्यक्रमास केज विधानसभा मतदार संघाच्या आ.नमिताताई मुंडदा यांचे प्रतिनिधी कृषी उत्पन्न



बाजार समिती चे उपसभापती डॉ.वासुदेव नेहरकर, भाजपा तालुका अध्यक्ष भगवान केदार,भाजपा जेष्ठ नेते सुनील आबा गलांडे,नेताजी शिंदे,वसंत केदार,सुदाम पाटील, पंडित सावंत व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.शिंदे सर यांनी तर आभार श्री.काळे यांनी मानले.

# नानासाहेब गर्जे यांची एमपीएससी द्वारा लिपीक पदासाठी निवड

**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी तालुक्यातील कापसी गावचे भूमीपुत्र नानासाहेब काकासाहेब गर्जे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या एमपीएससी परिक्षेतून मंत्रालयात लिपीक पदासाठी निवड झालेली आहे.नानासाहेब गर्जे यांचे वडील शेतकरी असून त्यांनी अत्यंत कष्टाने शेती व ऊसाच्या रसाचा व्यवसाय करुन आपल्या मुलाला शिक्षण दिलेले आहे. अत्यंत खडतर प्रवास सहन करुन नानासाहेब गर्जे यांनी आपले शिक्षण पूर्ण केलेले असून गावासमोर एक आदर्श निर्माण केलेला आहे. कापसी गावातील समाजकारणात सक्रीय असणारे भाऊसाहेब गर्जे यांचा नानासाहेब गर्जे हा पुतण्या आहे. नानासाहेब गर्जे यांच्या या यशाबद्दल समाजसेवक विजयकुमार गोल्हार, जि. प. बीड च्या माजी अध्यक्षा सौ. सविताताई गोल्हार, सरपंच काकासाहेब गर्जे, यमाजी खंडागळे, दादासाहेब गोल्हार, महादेव गोल्हार,



मारुती बाजीराव गोल्हार, सरपंच विष्णू दहिफळे, सरपंच संजय मिसाळ, सरपंच अभयराजे गर्जे, नेते बिभिषन साळूंके, आदर्श शिक्षक राजेंद्र लाड, कापसी गावातील ग्रामस्थ, मित्रपरिवार यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिलेल्या आहेत.

# मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडिया अध्यक्ष पदी रामदास तपसे तर सचिवपदी प्रकाश मुंडे यांची निवड

**केज/प्रतिनिधी**

केज तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडियापत्रकार परिषदेच्या केज तालुका अध्यक्षपदी रामदास तपसे तर सचिवपदी प्रकाश मुंडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख सर, डिजिटल मीडिया राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे,डिजिटलमीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे सर यांच्या सूचनेनुसार केज येथे सक्रिय पत्रकार संघाच्या कार्यालयात बैठक संपन्न झाली.या बैठकीला तालुका मराठी पत्रकार परिषदेचे केज तालुका अध्यक्ष विजय आरकडे, जिल्हा उपाध्यक्ष गौतम बापु बचुटे,पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे सुहास चिद्रवार,दशरथ चौरे व डि.डी.बनसोडे बापू यांच्या उपस्थितीत सदरील बैठक पार पडली यावेळी सर्वानुमते मुद्देसूद चर्चा करून पुढील कार्यकारिणी निवडण्यात आली.अध्यक्ष




रामदास तपसे,सचिव प्रकाश मुंडे, उपाध्यक्ष अजय भांगे, संघटक सन्नी शेख तर कार्याध्यक्षपदी इक्बाल शेख व मार्गदर्शक म्हणून धनंजय कुलकर्णी यांची निवड करण्यात आली.

सदरील बैठकीला संतोष गालफाडे,रमेश गुळभिले, महादेव गायकवाड, नंदकुमार मोरे,मुब्बशीर खतीब व इतर मान्यवर पत्रकार बांधव उपस्थित होते.अखिल भारतीय स्तरावर पत्रकारांच्यान्याय हक्कासाठी लढा देणाऱ्या मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया पत्रकार परिषदेच्या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे,सदस्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# किरण जावळे यांना ऊस संदेश कृषी पत्रकार पुरस्कार जाहीर

**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी तालुक्यातील अहोरात्र बातम्या च्या शोधात असलेले पत्रकार किरण जावळे यांना ऊस संदेश कृषी पत्रकार - २०२४ जाहीर झाला आहे.किरण जावळे हे ऊस तोडणी कामगारांची दखल घेत शेतकऱ्यांना वेळोवेळी मदत करुन शेतकऱ्यांच्या समस्या शासन दरबारी पाठवण्याचे काम पेपरच्या माध्यमातून सविस्तर करत असतात. या कार्याची दखल घेवून जावळे यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल मा.



अतुल नाना माने पाटील राज्यस्तरावर पुरस्कार जावळे यांना जाहिर करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी जनाई गार्डन पेठ, शिराळा गार्डन पेठ, तालुका वाळवा, जिल्हा सांगली येथे हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. तरी तालुक्यातील पत्रकार बांधवांनी व मित्रपरिवाराने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शेवटी किरण जावळे यांनी केले आहे.

# शारदा इंग्लिश स्कूल केज शाळेस शिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग श्री. नागनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट

**केज/ प्रतिनिधी**

बीड जिल्हा माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी श्री.नागनाथ शिंदे हे दि.२२ फेब्रुवारी रोजी केज दौऱ्यावर असताना केज तालुक्यातील सीबीएसई बोर्डाची अधिकृत मान्यता असलेली एकमेव शाळा शारदा इंग्लिश स्कूल केज शाळेस सदिच्छाभेट दिली याप्रसंगी शाळेत शाळा अंतर्गत इयत्ता आठवी व नववीच्या वर्गास भेट देऊन अध्ययन,अध्यापन विषयक माहिती घेतली. याप्रसंगी विद्यार्थ्यांशी चर्चा करून समाधान व्यक्त केले.याप्रसंगी त्यांनी विविध वर्गांना भेटी दिल्या,शाळेच्या वतीने त्यांच्या समवेत शाळेचे व्यवस्थापक श्री.देशमुख पी एम,उपप्राचार्य सुरज सनी यांची प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी त्यांना



शाळेतील विविध उपक्रमाबद्दल शाळेतील माहिती देण्यात आली. परिसराची पाहणी केल्या नंतर शाळेचे नाविन्यपूर्ण उपक्रम,स्वच्छता,विद्यार्थी संख्या,गुणवत्ता पूर्ण शिक्षण याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. शाळेच्या भव्य इमारती मध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे काम शारदा इंग्लिश स्कूल केज यांच्या माध्यमातून होत असल्याने त्यांनी संस्थेचे सचिव श्री.रमेशरावजी आडसकर,प्राचार्य मिश्रा एस.एम व सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले शाळेला सदिच्छा भेट दिल्याबद्दल संस्थेचे सचिव श्री.रमेशराव आडसकर यांच्या वतीने शालेय प्रशासनाने त्यांचे स्वागत केले व आभार मानले.

# विधुत कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या ता.पाटोदा येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**प्रतिनिधी / पाटोदा**

येथील विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित पाटोदा येथे १९ फेब्रुवारी वार बुधवाररोजी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महवितरण चे सेवानिवृत्त सहाय्यक अभियंता आर. व्ही जाधव यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी श्री घाडगे साहेब श्री कदम साहेब श्री चौरे साहेब श्री दळवी साहेब विधूत कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या .चे .चेअरमन सुनील वाघमारे सचिव प्रभु सोपान जाधवर साहेब श्री अनपट साहेब श्री विर साहेब श्री काळे साहेब श्री आगलावे साहेब श्री हजारे साहेब श्री पवार साहेब श्री धुमाळ साहेब श्री शाहजी नाईकवाडे साहेब बोबडे साहेब




श्री पवळ मेजर श्री वैभव नाईकनवरे . श्री देवडे मेजर श्री राईज मेजर श्री दौलत भाई सह सर्व संचालक मंडळ व संस्थेचे सभासद हजर होते . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यवस्थापक विष्णू नाईकवाडे व संगणक ऑपरेटर गुलाम माजेद शेख यांनी परिश्रम घेतले तर आभार सचिव जाधवर यांनी मानले यावेळी संचालक सभासद उपस्थित होते.



# संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त बीडमध्ये प्लास्टिक मुक्त बीड अभियान उत्साहात संपन्न

**बीड ।प्रतिनिधी**

संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त आज बीड शहरात प्लास्टिक मुक्त बीड अभियान मोठ्या उत्साहात पार पडले. या उपक्रमाअंतर्गत भाजी मंडई व जुना मोंढा येथे प्लास्टिक कचरा संकलन व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सकाळी ८ वाजता काकू नाना मंडई येथे प्रारंभ झालेल्या या अभियानात स्वच्छता संदेश देणाऱ्या घोषणांनी वातावरण भारून गेले. आनंदग्रामच्या युवा कार्यकर्त्यांनी प्लास्टिक कचरा गोळा करत, नागरिकांना प्लास्टिक मुक्त जीवनशैलीचे महत्त्व पटवून दिले. या वेळी उपस्थित नागरिक आणि व्यावसायिकांनी प्लास्टिक मुक्तीची सामूहिक शपथ घेतली.

या अभियानाचे आयोजन इन्फंट इंडिया - आनंदग्रामतर्फे दत्ता बारगजे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम हाती घेणाऱ्या आनंदग्रामने प्लास्टिक मुक्तीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.या मोहिमेत व्यापारी महासंघ (कॅट) आणि बागवान संघटनेच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विशेष म्हणजे, व्यापाऱ्यांनी आनंदग्रामच्या युवा कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी त्यांना चहा, नाश्ता आणि फळांचा पाहुणचार दिला.पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलत, कार्यकर्त्यांनी नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना कापडी पिशव्यांचे वाटप केले. प्लास्टिकचा वापर टाळावा आणि कापडी पिशव्या स्वीकाराव्यात, असा संदेश त्यांनी दिला.

या अभियानात व्यापारी महासंघ, बागवान संघटना, सामाजिक संस्था, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पर्यावरण रक्षणासाठी संपूर्ण शहराने एकत्र येत दिलेला हा संदेश निश्चितच सकारात्मक बदल घडवेल.स्वच्छता हीच सेवा या गाडगेबाबांच्या तत्त्वाचा अवलंब करत, बीड शहराने प्लास्टिक मुक्ततेच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे.हे अभियान पुढील काळातही सातत्याने राबवून बीड शहराला संपूर्णपणे प्लास्टिक मुक्त करण्याचा निर्धार आनंदग्रामच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

# शिवशाही महानाट्यात सिने अभिनेत्री अलका कुबल जिजाऊ माँ साहेब

## व अभिनेत्री अमृता पवार महाडिक यांची सोयराबाईची भूमिकेत

**शिरूर कासार ।प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर आधारित शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे तीन प्रयोग शिवजन्मोत्सवानिमित्त गेवराई येथे आयोजित केले होते. सर्व शिवप्रेमी नागरीकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले होते. शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेले महानाट्य मध्ये यावेळी सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री अलका कुबल, या जिजामाता आऊसाहेबांच्या भूमिकेत होत्या तर छत्रपति शिवाजी महाराजांची भूमिका हे शंतनु मोघे साकारत होते, या महानाट्याचे दिगदर्शक महेंद्र महाडिक हे असून यांच्यासह सिने अभिनेते महेश कोकाटे, प्रकाश धोत्रे,रमेश रोकडे, डॉ. राजेश आहेर अभिनेत्री अमृता पवार महाडिक, तृप्ती भोसले, शिवानी जगदाळे सह इतर अनेक कलाकार मोठ्या उत्साहात विविध प्रकारच्या भूमिका सकरत आहेत.



पाच मजली किल्ल्याची हुबेहुब प्रतिकृती..!या महानाट्यसाठी पाच मजली किल्ल्याची हुबेहुब प्रतिकृती, शोभीवंत सिंहासन मेघडंबरी, जहाजाचा वापर करुन महाराजांच्या कोकण मोहिमेचा जिवंत देखावा, भव्य राज्याभिषेक सोहळा, शिवकालीन शस्त्रास्त्रे व युद्ध साहित्य यासह अधुनिक ध्वनी व प्रकाश योजना, घोडे, बैलगाडी, पालखी, नेत्रदिपक अतिषबाजी यांचा वापर करुन मराठा व पातशाही यांच्या तलवारींचा खणखणाट, तोफांचा गडगडाट, अग्नीबाणांचा वर्षाव असा घनघोर रणसंग्राम याच देही पाहण्याचे सौभाग्य शिवप्रेमींना लाभलेझी मराठी..स्टार प्रवाह.. वरील मालिकेसह महानाट्य मध्ये विषेश भूमिका..!मी १५ वर्षांन पासून मराठी चित्रपट सृष्टी मध्ये काम करत आहे. त्या माध्यमातून अनेक प्रायोगिक व व्यावसायिक नाट्य क्षेत्रात ही काम केले आहे. त्याच प्रमाणे मराठी चित्रपट सृष्टी मध्ये नावाजलेले अभिनेते,दिग्दर्शक आणि निर्माते महेश कोठारे यांची जय मल्हार ही मालिका झी मराठी वर सुरु असताना त्या मध्ये बानू बाई ह्या व्यक्ती रेखेच्या बहिणीची भूमिका साकरण्यास मिळाली, त्याच प्रमाणे स्टार प्रवाह वरील लक्ष या मालिके मध्ये मध्ये देखिल अनेक प्रकारची भूमिका साकारल्या आहेत. सध्या मी महेंद्र वसंतराव महाडीक लिखित दिग्दर्शीत शिवपुत्र संभाजी या महानाट्या मध्ये पुतळा बाई साहेब ह्यांची भूमिका साकाराते आहे.तर शिवशाही या महानाट्या मध्ये सोयराबाई साहेब ही भूमिका साकारत आहे.तसेच महाराज शंभू छत्रपती प्रोडक्शन ची निर्माती म्हणून धुरा सांभाळते आहे.-- सौ,अमृता महेंद्र महाडिक -- सिने अभिनेत्री तथा महाराज शंभू छत्रपती प्रोडक्शन निर्माती..

# एकदम निष्क्रिय मुख्याधिकारीचे बदलीसाठी रस्त्यावर उतरू- खुर्शीद आलम

नागरिक स्वाक्षरी मोहीम घेऊन वरिष्ठांकडे पाठविण्यात येणार बीड(प्रतिनिधी)नगरपरिषदेत मुख्याधिकारी श्रीमती निता अंधारे आल्यापासून चार चार महिने नाल्या व रस्तेंची साफसफाई होत नाहीये स्वच्छतेचा बट्ट्याबोळ झाला आहे, नागरिकांना पाण्याचे पाणी स्वच्छ आणि वेळेवर मिळत नाहीये, सहा सहा महिने पथदिवे बंद असते, रजिस्टराचे लेंज्ञ लळपवळपस न झाल्यामुळे रजिस्टरांचे बुग्गा झाले आहेत म्हणून झढठ मिळत नाहीत त्यामुळे गरीब घरकुलापासुन वंचित आहेत , नगरपरिषदेच्या प्रत्येक विभागात भ्रष्टाचार दिसून येते, नवीन रोड नाल्या होतांना दिसत नाहीये मात्र कोट्यवधीचे बिले निघत आहेत. जुनेच कामाचे नवे किंवा डबल बिले दिली जाते असे वाटत आहे म्हणजे बीड नगरपरिषदेत प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार वाढलेला दिसून येत आहे, नगरपरिषदेचा भोंगळेपणा दररोज प्रत्येक वर्तमानपत्रांमध्ये सुद्धा दिसून आहेत, अतिक्रमणे काढतांना धनदांडग्यांचे सोडून गोरगरिबांचेच अतिक्रमण काढले, अतिक्रमणे काढलेल्या गटारी सुद्धा साफ केले नाही मग अतिक्रमणे काढण्याचा फायदा काय ? अशा प्रश्न निर्माण झाले, मुख्याधिकारी अंधारे प्रशासकाच्या नावाखाली मनमानी अंधाधुंद कारभार करत आहेत, मी पंचवीस वर्षे पासुन बीड नगरपरिषदेच्या माध्यमातून नागरिकांची सेवा करीत आहेत पण आजपर्यंत एवढ्या निष्क्रिय मुख्याधिकारी बघीतले नाहीत असे मत खुर्शीद आलम यांनी व्यक्त केले, शहर स्वच्छतेसाठी,पाणीसाठी, लाईटसाठी आणि रस्ते नाल्यांचे विकास कामांसाठी मुख्याधिकारी मुख्याधिकारी निता अंधारे यांची तातडीने बदली होणे अत्यावश्यक आहेत म्हणून रस्त्यावर उतरून सर्वसामान्य नागरिकांत जाऊन स्वाक्षरी मोहीम घेऊन त्या तक्रारी वरिष्ठ अधिकाऱ्या आणि पदाधिकार्यांकडे देण्यात येणार असल्याचे बीड नगरपरिषदेचे माजी सभापती खुर्शीद आलम यांनी पत्रकात म्हटले आहे,





# वडवणी शहरामध्ये संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी

**वडवणी ।प्रतिनिधी**

दि.२३ फेब्रुवारी रोजी गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला या भजनातून लोकांना मंत्रमुग्ध करणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती वडवणी शहरांमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. संत गाडगेबाबांनी जनतेला भुकेलेल्यांना अन्न - तहानलेल्यांना पाणी, उघडच्यानागडच्यांना-वस्त्र, गरीब मुलामुलींना शिक्षणासाठी मदत, बेघरांना आसरा अंध, अपंग रोगी यांना औषधोपचार, बेकारांना रोजगार पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण-तरुणींचे लग्न, दु:खी व निराशांना-हिंमत हाच खरा धर्म. ! अशी शिकवण देणारे संत गाडगे महाराज यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील शेणगाव एका धोबी कुटुंबात झाला.संत म्हणून आपले जीवन जगण्यासाठी आपले कुटुंब सोडण्यापूर्वी त्यांनी आपल्या मनातून स्वयंसेवक म्हणून काम केले.

आपला ट्रेडमार्क झाडू घेऊन जात असे आणि टोपी घालत असे. जेव्हा ते गावात पोहोचायचे तेव्हा ते गावातील नाले आणि रस्ते स्वच्छ करायचे व गावकऱ्यांनी पैसे दिले तर ते समाजासाठी काहीतरी चांगले करण्या साठी वापरले जात असत राष्ट्रसंत गाडगे महाराज महाराजांनी मिळालेल्या पैशातून अनेक शैक्षणिक संस्था, धर्मशाळा, रुग्णालये, प्राणी निवारे सुरू केले आहेत. त्यांनी कीर्तनाचे वर्गही चालवले, बहुतेक कबीरांच्या दोहेतून समाजाला नैतिकतेचे धडे मिळतात. त्यांनी लोकांना साधे जीवन जगावे, धार्मिक कारणांसाठी होणारी जनावरांची कत्तल थांबवावी आणि दारूबंदीविरोधात मोहीम राबवावी, असे आवाहन केले. त्यांनी कठोर परिश्रम, साधे जीवन आणि गरिबांची निःस्वार्थपणे समाजाची सेवा केली त्याबरोबरच महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नावाने महाराष्ट्र ग्रामीण स्वच्छता अभियान राबवली त्याचबरोबर त्यांचे नाव महाराष्ट्रातील एका विद्यापीठाला सुद्धा मिळाले आहे.हा त्यांच्या कार्याचा गौरव आहे समाजासाठी ते प्रेरणादायी व्यक्तिमत्व होते.

या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नागरिक राजेभाऊ वारे,बाबासाहेब चाटे,ओबीसी नेते वैजनाथ शिंदे सर,आप्पा राजुरकर,बाळासाहेब डिगे, डी.जे सोळंके,ऋषिकेश चौधरी,काकडे सर रंजीत भोसले ,बि.डी.मुंडे सर पत्रकार अर्जुन मुंडे सर पत्रकार विष्णू डोईफोडे सर,उजगरे सर,बालासाहेब राऊत,दत्ता शिंदे,वैजनाथ घाटुळ या कार्यक्रमाचे संयोजक युवा नेते संघर्ष भैय्या राऊत.याचबरोबर अनेक मान्यवर उपस्थित होते.

# खेळ पैठणीचा कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद कड्याच्या शुभांगी देवकरने पटकावला प्रथम क्रमांक

**आष्टी (प्रतिनिधी)**

जामगावचे सरपंच राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे शुक्रवारी पंचायत समितीच्या प्रांगणात महिलांसाठी सीने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर यांचा खेळ पैठणीचा या होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी झालेल्या विविध खेळांच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक कडा येथील शुभांगी देवकरने पटकावला मानाची पैठणी,फ्रीज,सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप होते.प्रामुख्याने मनोरंजन व प्रश्नमंजुषा व विविध उपक्रमास महिला वर्गाची अलोट गर्दी कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला.

श्याम धस यांच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने महिला भगिनींसाठी खास सिने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर यांच्या राज्यभर गाजत असलेल्या होम मिनिस्टर 'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी महिलांनी तळ्यात मळ्यात,उखाणे,फुगा फोडणे,फॅशन शो या सह अनेक गीतांवर ठेका धरत स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला.अभूतपूर्व उत्साही वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल हजारोच्या संख्येने आलेल्या महिलांनी श्याम धस यांचे विशेष आभार मानले.शिवाय आकर्षक बक्षिसांची लयलूट यावेळी पहायला मिळाली.ज्यामध्ये प्रथम पारितोषिक म्हणून घरगुती वापराचे फ्रीज द्वितीय पारितोषिक एल. इ. डी. टीव्ही,तृतीय पारितोषिक कुलर,चतुर्थ पारितोषिक वॉटर फिल्टर,पाचवे पारितोषिक मिक्सर होते.ज्यामध्ये अनुक्रमे प्रथम येण्याचा मान कडा येथील शुभांगी गणेश देवकर यांनी द्वितीय शितल सतीश भोसले तृतीय काजल भाऊसाहेब भोजने चतुर्थ रोहिणी दिलीप जगताप तर पाचवे पारितोषिक जया परमेश्वर वारंगुळे यांनी पटकावले. शिवाय यामध्ये सहभागी झालेल्या तीनशे महिलांना आकर्षक स्वरूपात भेटवस्तू देण्यात आल्या तर अनुक्रमे विजेत्या महिलांसह इतर दहा महिलांना पैठणीचे वाटप करण्यात आले.



श्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी सकाळी नऊ ते पाच या वेळेत पंचायत समिति कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित रक्तदान शिबिरामध्ये १३० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# किसान सभेच्या जिल्हाध्यक्षपदी कॉ.डी.जी. तांदळे तर सचिव पदी कॉ.ज्योतीराम हरकुडे

**बीड ।प्रतिनिधी**

अखिल भारतीय किसान सभेचे जिल्हा अधिवेशन स.मा. गर्गे वाचनालय बीड येथे दि. २० फेब्रुवारी २०२५ या दिवशी थाटात संपन्न झाले या प्रसंगी कॉ. गोविंद पानसरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून त्यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या कार्याला उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घघाटक म्हणून कृषी प्रवेक्षक ज्ञानदेव जांभूळकर साहेब तर अध्यक्ष म्हणून जेष्ठ कामगार नेते कॉ.नामदेव चव्हाण हे होते तर किसान सभेचे राष्ट्रीय कौन्सिलर कॉ. महादेव नागरगोजे आणि भाकपाचे जिल्हा सचिव कॉ.भाऊराव प्रभाळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. फेब्रुवारी महिन्यात मांडण्यात आलेल्या आर्थिक बजेट यामध्ये शेती क्षेत्राकडे केलेले दुर्लक्ष यावर शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आणि सरकारने कृषी आयोग नेमून कृषी क्षेत्राला स्वतंत्र बजेट मंजूर करावी, थकलेला सर्व पिक विमा विनाअठ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा, या प्रश्नासंदर्भात मागण्या मान्य न झाल्यास १२ मार्च २०२५ या दिवशी किसान सभा तीव्र आंदोलन छेडल असा इशारा देण्यात आला. बीड येथील रेल्वे स्टेशनला कॉ. क्रांती सिंह नाना पाटील यांचे नाव देण्यात यावे असा एकमताने ठराव पास करण्यात आला. कारण त्यांनी बीड जिल्ह्याचे खासदार असताना दिल्लीच्या संसदेमध्ये प्रथम रेल्वे बीडला यावी यासंदर्भात आवाज उठवला होता.

या प्रसंगी बीड.केज धारूर,पाटोदा,गेवराई,वडवणी,शिरूर,अंबाजोगाई,या तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते. या अधिवेशनामध्ये शेवटी जिल्हा जर्यकारणी जाहीर करण्यात आली. किसनसभेचे अध्यक्ष म्हणून कॉ. डी.जी.तांदळे,उपाध्यक्ष कॉ. रामदास कदम, कल्याण चाटे,जिल्हा सचिव कॉ.ज्योतीराम हुरकुडे,सहसचिव कॉ.आसाराम मुळे,कॉ.आत्माराम राख,कोषध्यक्ष कॉ. आश्रुबा आखाडे तर सदस्य म्हणून परमेश्वर



थोरात,कॉ.दिलीप जोगदंड,कॉ. संतोष घुमरे, अण्णासाहेब चालक,शिवहारी राऊत, सुधाकर सिरसट,सुखदेव नागरगोजे,विठ्ठलराव सवासे यांची निवड करण्यात आली.अधिवेशना दरम्यान सांगमेश्वर आंधळकर, विनोद मगर,अरुण कानडे,शेषेराव माचवे,नवनाथ रांजवन, सुधाकर डोळस,दादासाहेब घुमरे,प्रकाश काकडे,गणेश पुरी आदींनी परिश्रम घेतले.

# नागसेन बुद्ध विहार येथे संतश्रेष्ठ गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात संपन्न

## वाचाल तर वाचाल तर्फे ५० पुस्तके वितरित करून विनम्र अभिवादन

**बीड ।प्रतिनिधी**

शिक्षणापासून वंचित असलेल्या बहुजनांनी शिक्षणाकरिता भांडीकुंडी विका उपाशी पोटी राहा पण आपल्या पाल्यास शिक्षण द्या व अंधश्रद्धा, आळस,नशा पाणी मादक पदार्थ व कर्जबाजारीपणा पासून देवाचे नवस फेडणे, यापासून दूर राहण्याचा व माणसाची सेवा हीच ईश्वराची सेवा आहे. स्वतः ग्रामस्वच्छता करून परिसर स्वच्छतेचे महत्व सागनारे माणसातच देव आहे हे आपल्या अनमोल कीर्तनातून बोली भाषेत बहुजन समाजाला समजावून सांगणारे संतश्रेष्ठ संत गाडगेबाबा यांना नागसेन बुद्ध विहार धानोरा रोड बीड येथे वाचाल तर वाचाल या फिरते मोफत वाचनल्यातर्फे विहार परिसरातील विद्यार्थ्यांकरिता ५० पुस्तकांचा संच वाचनालयाचे डी.जि वानखेडे यांनी प्रमुख उपस्थित असलेले सरस्वती विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मा.उत्तमराव पवार व सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एलआयसी यु.एस. वाघमारे यांच्या हस्ते वितरित करण्यासाठी श्रबौद्धाचार्य डी. एन. पोटभरे यांना सुपूर्त केला व संत गाडगेबाबा यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. या संचामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर, संत गाडगेबाबा, डॉ एपीजे अब्दुल कलाम, स्वामी विवेकानंद , व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय अशा विविध विषयावरील पुस्तकांचा समावेश आहे. सर्वप्रथम तथागत महात्मा गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस पुष्प , डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला अर्पण करून महिला मंडळा हासते अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सुनील कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संत गाडगेबाबांनी त्यांना मिळालेल्या दानातून धर्मशाळा बांधल्या व गोरगरिबांच्या शिक्षणाच्या करिता शिक्षणाचे कार्य करणाऱ्या धर्मदाय संस्थांना वस्तीगृह किंवा शाळेकरीता दिल्या. त्यांनी त्यांच्या जीवनात समाज सुधारण्याकरता अनिष्ट रूढी परंपरा पासून दूर राहण्याकरिता केलेल्या अनेक कार्याबद्दल सविस्तर माहिती दिली. महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले यांनी अभिवादन प्रसंगी सांगितली की विहारे ही संस्कार केंद्रे व्हावीत तसेच समाज बांधवात विचारविनिमय होण्याची केंद्रे व्हावीत असे स्पष्ट केले. याप्रसंगी वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाच्या कार्यपद्धतीबद्दल सविस्तर माहिती वाचनायाचे डी. जी. वानखेडे यांनी दिली. मुलांच्या हातात चांगली पुस्तके वाचन संस्कृती वाढवण्याकरता हे वाचनालय प्रयत्न करीत आहे. त्यास बीड शहरातील विद्यार्थ्यांचा भरपूर प्रतिसाद मिळत आहे. कार्यक्रमास कॅप्टन राजाभाऊ आठवले, के. एस. वाघमारे, अँड. तेजस वडमारे, विहारांच्या महिला मंडळाच्या केशर कांबळे, सुनिता शिंदे, विमल डोळस, अंजली वीर, निकिता वीर, सानवी वीर, विद्या कोरडे, शालीन वीर, सुनिता शिंदे, प्रांजल वीर व, रवी सोनवणे, के बी गायकवाड, श्रीरंग डोळस, एम एल गायकवाड, सम्यक



विद्यागर, दादासाहेब गायकवाड, एम एल गायकवाड, दादासाहेब जाधव, व परिसरातील बहुसंख्य महिला, पुरुष बालकांची उपस्थिति होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी.एम. विद्याधर यांनी व्यक्त केले.सरणातयणे कार्यक्रमाची सांगता झाली.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड -४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत). का.संपादक : शेख आयेशा

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122(MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

# लोहारा येथील अंजुम शेख यांच्या हरवलेल्या ७० हजार रुपयांच्या दोन कपड्यांच्या बॅगा शहर वाहतूक शाखेने अवघ्या दोन तासात सापडून दिल्या !

बीड ।प्रतिनिधी

लोहारा जिल्हा धाराशिव येथील अंजूम शेख या आपल्या सहकारी महिलेसोबत बीड येथे कपडे खरेदीला आल्या होत्या. मोमीनपुरा येथील होलसेल दुकानातून कपडे खरेदी केल्यानंतर त्या रिक्षाने बीड बस स्थानकात आल्या. मात्र गडबडीत रिक्षातील दोन मोठ्या कपड्याच्या गोण्या काढण्याचे विसरून गेले. बीड बस स्थानकामध्ये गेल्यानंतर लक्षात आले. तोपर्यंत रिक्षावाला निघून गेला होता. बीड बस स्थानक परिसरात असलेल्या वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या नेतृत्वाखाली वाहतूक शाखेच्या पोलीस पथकाने सर्व ठिकाणचे सीसीटीव्ही चेक करत संबंधित रिक्षा चालकास शोधून काढले आणि त्या रिक्षा मधील कपड्याच्या त्या ७० हजार रुपयांच्या दोन गोण्या संबंधित महिलेला मिळवून दिल्या. पोलिसांनी दाखवलेली ही माणुसकी बीड बस स्थानक परिसरात चर्चेचा विषय ठरली. त्यांच्या या स्तुत्य कार्याबद्दल पोलीस दलासह सर्व क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.



धाराशिव जिल्ह्यातील लोहारा येथील अंजुम शेख आणि त्यांच्या सहकारी या आपल्या गावी कपड्याचा व्यवसाय करतात.कपडे खरेदीसाठी त्या बीड येथे येत असत. मोमीनपुरा येथील होलसेल दुकानांमध्ये त्यांनी नेहमीप्रमाणे कपडे खरेदी केले. खरेदी केलेल्या कपड्यांच्या गोण्या त्यांनी रिक्षामध्ये टाकून आपल्या गावी जाण्यासाठी परत निघाल्या. बीड बस स्थानक परिसरात आल्यानंतर त्यांनी रिक्षातील कपड्याच्या गोण्या आणि इतर सामान काढले.पण नजर चुकीने रिक्षातील आणखीन दोन कपड्याच्या मोठ्या गोण्या ज्यामध्ये जवळपास ७० हजार रुपयांचे कपडे होते ते काढायच्या विसरून गेल्या. दरम्यान पॅसेंजरला उतरल्यानंतर रिक्षावाला निघून गेला. पाच मिनिटानंतर अंजुम शेख आणि त्यांच्या सोबत असलेल्या सहकारी महिलेला आपल्या सोबत एकूण असलेल्या गोण्यांपैकी २ मोठ्या गोण्या दिसून आल्या नाहीत.म्हणून त्यांनी शोधाशोध सुरू केली. त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की रिक्षा मधून आपण दोन गोण्या काढायचे राहून गेले होते. आता त्या रिक्षावाल्याला शोधायचे कसे ? असा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर उभारला होता. शोधाशोध सुरू असताना बीड बस स्थानक परिसरात असलेल्या जिल्हा वाहतूक शाखेच्या बीड बस स्थानकातील पोलीस चौकीमध्ये त्या गेल्या. तिथे वाहतूक शाखेचे जिल्हा पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर आपल्या इतर सहकारी पोलीस कर्मचाऱ्यांसमवेत ड्युटीवर तैनात होते.? घटनेची माहिती कळतच त्यांनी तात्काळ पोलीस कंट्रोल रूम मध्ये सीसीटीव्ही चेक करण्यास सांगितले.सीसीटीव्ही मध्ये सदरील रिक्षा कॅच झालेला होता. त्या आधारे पोलीस यंत्रणेने तात्काळ शोधाशोध सुरू केली.त्यावेळी त्यांना तो रिक्षा बीड बस स्थानक समोरील बंजारा हॉटेल समोर दिसून आला. त्यांनी तात्काळ त्या रिक्षा चालकास विचारपूस केली असता त्या रिक्षा चालकांन देखील प्रामाणिकता दाखवत सदरील कपड्यांच्या दोन गोण्या माझ्या रिक्षात त्या दोन महिला प्रवाशांच्या राहिल्याचे लक्षात आल्यानंतर मी त्यांचा शोधाशोध घेण्यासाठी इथे आलो असे सांगितले त्यानंतर त्या दोन महिलांना पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी त्या बोलावून त्या गोण्या त्यांच्याच असल्याबद्दल खात्री करत त्यांना त्या परत दिल्या. सदरील घटना २१ फेब्रुवारी रोजी दुपारी ४.३० वाजण्याच्या दरम्यान घडली होती. आपल्या हरवलेला कपड्यांचा माल परत मिळाल्याने शेख अंजुम सह त्यांच्यासोबत असलेल्या सहकारी महिलेने पोलिसांनी दाखवलेल्या माणुसकी बद्दल आणि प्रामाणिकतेबद्दल अभिनंदन करून आभार व्यक्त केले.

बीड जिल्हा वाहतूक पोलीस शाखेने अवघ्या दोन तासात सदरील पर जिल्ह्यातील महिलांना त्यांचा हरवलेला माल परत सापडून दिल्याबद्दल बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्यासह पोलीस उपविभागीय अधिकारी विश्वंभर गोल्डे,अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शेख उस्मान सर यांच्यासह पोलिस अधिकारी कर्मचारी यांनी बीड जिल्हा वाहतूक शाखेच्या टीमचे अभिनंदन करून या स्तुत्य कार्याबद्दल शुभेच्छा दिल्या. बीड जिल्हा वाहतूक शाखेचे या कार्याबद्दल सर्व स्तरातून पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर सर यांच्यासह जिल्हा वाहतूक शाखेच्या सर्व टीमचे अभिनंदन होत आहे.

## आरंभचा अनोखा प्रारंभ करतांना मान्यवरांच्या भेटीने समाज कार्यासाठी बळ मिळाले – अनिल देवतरासे




बीड ।प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील आरंभ मित्र मंडळ आयोजित ३९५ वा शिवजन्मोत्सव सोहळा १९ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला. यावेळी आरंभ टिमच्या वतीने अनोखा उपक्रम राबविण्यात आला.

यासाठी मान्यवरांच्या भेटीने आत्मबळ वाढले असे मत अनिल देवतरासे यांनी व्यक्त केले. अनावश्यक खर्च न करता अन्नदान कार्यक्रम आयोजित करून उपक्रम राबविण्यात आला.यावेळी जेष्ठ नेते माजी न.प.सभापती तथा भाजपाचे उपाध्यक्ष नवनाथ आण्णा शिराळे यांनी भेट देऊन उपक्रमाची प्रशंसा केली.



बीड – सोमेश्वर मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त ह भ प विक्रम महाराज काळे यांचा सत्कार करताना सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर संस्थांचे अध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील,समवेत पांडुरंग जांनवळेसह भक्तगण.

# निराधार सरस्वती शिंदेना घरकुल मिळाले

### लिंबागणेश ग्रामपंचायत येथे प्रधानमंत्री आवास योजनेचे मंजुरी पत्र वाटप – डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात दि.२२ शनिवार रोजी सरपंच बालासाहेब जाधव, ग्रामविकास अधिकारी वीर,सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, बाळकृष्ण थोरात, दादा गायकवाड, श्रीहरी निर्मळ यांच्या उपस्थितीत गावातील एकुण १५७ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचे मंजुरी पत्र वाटप करण्यात आले.

निराधार सरस्वती शिंदेंना हक्काचा निवारा मिळणार...लिंबागणेश येथील सरस्वती माणिक शिंदे वय ६० वर्षे यांच्या पतीचे निधन ३० वर्षांपूर्वी झाले. मोलमजुरी करून मुलीचे पालनपोषण करून लग्न लावून दिले. २ वर्षांपूर्वी राहते मातीचे घर जमिनदोस्त झाले. त्यानंतर महिला बचतगट भवनात संसार थाटला.२ वर्षांपासून भवनात राहतात.रात्री लाईट नसल्याने १५ दिवसांपूर्वी घुशीने गालाचा चावा



घेतला.अखेर काल ग्रामपंचायत कार्यालयात त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल मंजुरीचे प्रमाणपत्र मिळाले आणि अखेर त्यांच्या निवा–याचा प्रश्न सुटणार असल्याने चेह–यावर समाधान दिसून आले.घरकुल लाभार्थ्यांकडुन एकही रुपया न घेता कागदपत्रे सुद्धा सरपंचांनी स्वखर्चाने बनवली हे कौतुकास्पद :– डॉ.गणेश ढवळे घरकुल मंजुरी बाबतीत लाभार्थ्यांकडुन अवाजवी पैसे घेतल्याची ओरड एकीकडे होत असताना लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, दादासाहेब गायकवाड व बाळकृष्ण थोरात यांनी लाभार्थ्यांकडुन एकही रुपया न घेता शासन दरबारी फायली फिरवत स्वखर्चाने कागदपत्रे सुद्धा बनवली हि बाब कौतुकास्पद असुन याबद्दल ग्रामस्थांनी यांचे आभार मानले.

## शेख झीनत यांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर

जागतिक महिला दिनी होणार मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मान

बीड ।प्रतिनिधी

केज येथील नामांकित राजीव गांधी उर्दू प्राथमिक शाळेतील सहशिक्षिका शेख झीनत मोहम्मद सलीम यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांना पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक महिला दिनी देण्यात येणाऱ्या जागतिक स्तरावरील स्त्री रत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

सेवानिवृत्त सहाय्यक फौजदार मोहम्मद सलीम यांच्या कन्या शेख झीनत या केज येथील राजीव गांधी उर्दू प्राथमिक शाळेमध्ये सहशिक्षका म्हणून कार्यरत आहेत. अतिशय अल्पवयात शैक्षणिक कार्यासह सामाजिक कार्यामधील त्यांचा उत्स्फूर्त सहभाग लक्षात घेऊन त्यांना पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार त्यांना जाहीर झाल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

जगावेगळे वेगळेपण जपणाऱ्या



महिलांनी पुरस्कारासाठी संपर्क करावा – शेख आयेशा

ज्या महिलांनी शून्यातून विश्व निर्माण करत आपले अस्तित्व उभा केले आहे. अशा यशस्वी महिलांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च २०२५ रोजी सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारास पात्र असणाऱ्या मुलींनी, महिलांनी आपल्या कार्य अहवालासह तात्काळ ७० ३० १४ ९३ २२ यानंबर वर संपर्क साधावा असे आवाहन आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा पत्रकार शेख आयेशा यांनी केले आहे.

# अभिनव पब्लिक स्कूलच्या स्नेहसंमेलनात बालझुंबड

दिंद्रुड ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील अभिनव पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवारी उत्साहात पार पडले. अबाल विद्यार्थ्यांनी विविध गितांवर सादर केलेल्या नृत्यांनी प्रेक्षकांना भुरळ घातली. विद्यार्थ्यांची बाल झुंबड उपस्थितांची वाहवा मिळवत होती.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पंढरी मल्टीस्टेटचे अध्यक्ष सुरेश तिडके साहेब व उद्घाटक म्हणून दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सपोनि अण्णाराव खोडेवाड, सुप्रसिद्ध व्याख्याते गणेश घायतिडक,विलास खाडे, बळीराम पारेकर, पत्रकार संतोष स्वामी,नवनाथ कांबळे, ज्ञानोबा कटारे यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेचे अध्यक्ष अभिमान पारेकर यांनी शाळेचा वार्षिक प्रगती अहवाल मांडला. विद्यार्थ्यांना शालेय जीवनात अभ्यासाबरोबरच अंगात असणाऱ्या विविध कला सादर करण्यासाठी पालकांनी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. मुलांच्या गुणांना वाव देण्यासाठी स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून अभिनव पब्लिक स्कूलने विविध प्रकारचे उपक्रम राबवल्याबाबत दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सपोनी अण्णाराव



खोडेवाड यांनी शाळेचे कौतुक केले. नवयुग बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अध्यक्ष अभिमान पारेकर,उपाध्यक्ष गणेश लाटे,सचिव गणेश गटकळ सह शिक्षक सहकार्यांनी 'नवरत्न उत्सव २०२५ 'स्ननेहसंमेलन यशस्वी पार पाडले. श्री गणेश वंदना पासून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सामाजिक, सांस्कृतिक, पारंपरिक गीतांवर याप्रसंगी विद्यार्थी उत्साहात थिरकले. उपस्थित पालकांनी टाळ्यांचा प्रतिसाद देत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या आभार प्रदर्शन बाळकिसन कटारे यांनी केले तर सूत्रसंचालन शाहनवाज शेख यांनी केले.



बीड येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यालयांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलनाचे जनक महान राष्ट्रसंत गाडगे महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम या विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक व्ही.जी. आव्हाड आणि मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये उत्साहात संपन्न झाला.याप्रसंगी राष्ट्रसंत गाडगे महाराज स्वच्छता अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी शालेय परिसर स्वच्छ केला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रसंत गाडगे महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी व्हीजी आव्हाड आणि बीए हावळे यांनी व्यासंगी आणि अभ्यासू विचार प्रतिपादन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे संचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख, प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस. वाघमारे यांनी केले. यावेळी आर.बी. घुले, यु.बी.पवळ, डी.जी. हजारे, एल.बी. हजारे, शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## राष्ट्र संत गाडगे महाराजांनी समाज आणि व्यक्ती मनाची स्वच्छता केली – प्राचार्य डॉ. संजय गवई



लातूर ।प्रतिनिधी

राष्ट्र संत गाडगे महाराजांनी तत्कालीन काळामध्ये समाज आणि व्यक्ति मनाचा स्वच्छतेचा अमूल्य संदेश देऊन सार्वजनिक स्वच्छता केली आणि त्यामुळेच आज त्यांच्या नावाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीची निर्मिती झाली आहे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले.

महाराष्ट्र शासन, महाविद्यालय जयंती उत्सव समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्र संत गाडगे महाराज यांची जयंती प्राचार्य कक्षात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. यावेळी पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, जयंती उत्सव समितीचे समन्वयक डॉ. धोंडीबा भुरे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. किसनाथ कुडके, प्रा. सागर ठाकूर आणि योगेश मोदी यांची उपस्थिती होती.सर्वप्रथम राष्ट्र संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेला सर्वांच्या उपस्थितीत पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.यावेळी डॉ. रत्नाकर बेडगे आणि नामदेव बेंदरगे यांनीही मनोगते व्यक्त केलीत.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन

## दावरवाडी ग्रामपंचायत मध्ये राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती साजरी.....!




पैठण/प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील दावरवाडी येथील ग्रुप ग्रामपंचायत मध्ये राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली त्यावेळी राष्ट्र संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला ग्राम पंचायत सरपंच डी.डी जाधव यांनी पुष्पहार अर्पण करून वंदना केली यावेळी गावातील नागरिक हजर होते

त्यावेळी उपस्थिती सरपंच डी.डी.जाधव प्रशांत देशमुख जिल्हा बँकेचे शाम तांगडे सोसायटी चेअरमन राजेंद्र वाघमोडे चंद्रभान

चोरमले विष्णू सोरमारे लक्ष्मण सोरमारे गोपाल धारे राजु ननवरे मीठु ननवरे रावसाहेब काकडे सचिन मगरे गणेश गिरी आदींची उपस्थिती होती





## सत्यशोधक डॉ संतुजी लाड सार्वजनिक जयंती उत्सव समिती जाहीर

लातूर ।प्रतिनिधी

लातूर सत्यशोधक समाजाचे अग्रदुत महात्मा जोतिबा फुले यांचे सहकारी शिष्य,हिंदु खाटीक समाज भूषण डॉ संतुजी रामजी लाड यांच्या १८४ व्या जयंती निमित्त अँड प्रदिपसिंह गंगणे यांच्या अध्यक्षते खाली बैठक संपन्न झाली यावेळी सर्वानुमते डॉ संतुजी लाड सार्वजनिक जयंती उत्सव समिती लातूर अध्यक्षपदी दिगंबर कांबळे यांची निवड जाहीर करण्यात आली आहे.

उर्वरित कार्यकारणी मध्ये उपाध्यक्ष अँड इरफान शेख, स्वागताध्यक्षपदी दिनेश गोजमगुंडे, कोषाध्यक्ष आनंद पारसेवार तर कार्यकारिणी सदस्य पदी राजु बुये, इंद्रजीत गंगणे, प्रविण नरवडे,रोहीत रूमने, रोहित थोरात,देवेंद्र जोशी आदींची निवड करण्यात आली आहे.या बैठकीस कैलाश डोंगरे ताहेरभाई सौदागर, राहुल सौदागर गोवर्धन गंगणे, किरण कांबळे,अँड सुहास बेंद्रे , दिपक गंगणे, जम्मालोद्दीन मणियार, विनोद डोंगरे,भीम दूनगावे, श्रीनिवास रांजणकर, केदार कोथिंबीरे , श्रीकांत गंगणे,राजेश रूमने,रामभाऊ जवळगेकर,रविकुमार वंजारे आदीची उपस्थिती होती. अभिवादन कार्यक्रम ४ मार्च रोजी सकाळी १० वा गांधी मैदान लातूर येथील नियोजित डॉ संतुजी लाड पुतळा परिसरात होणार असल्याची माहिती संयोजकांनी दिली आहे.

लातूर सत्यशोधक समाजाचे अग्रदुत महात्मा जोतिबा फुले यांचे सहकारी शिष्य,हिंदु खाटीक समाज भूषण डॉ संतुजी रामजी लाड यांच्या १८४ व्या जयंती निमित्त अँड प्रदिपसिंह गंगणे यांच्या अध्यक्षते खाली बैठक संपन्न झाली यावेळी सर्वानुमते डॉ संतुजी लाड सार्वजनिक जयंती उत्सव समिती लातूर अध्यक्षपदी दिगंबर कांबळे यांची निवड जाहीर करण्यात आली आहे.

शिव वाणी SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी म्हणजेच साप्ताहिक



# रायगडात मटक्याला काले दिवस ;अवैध मटका जुगारांवर रायगडात धाडी!



गडब/सुरेश म्हात्रे

जिल्ह्यात सुरु असलेल्या अवैध मटका जुगारासह सट्टेबाजीवर रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने छापा टाकला. या छाप्यात मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, मटका चालविणाऱ्या माफियांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. दणक्याने पोलिसांनी धडक कारवाई करीत शनिवारी (दि. २२) तब्बल १६ जणांवर कारवाई केली. या कारवाईबाबत समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्ह्यात अनेक भागात अवैधरित्या मटका जुगार, सट्टा हा धंदा राजरोसपणे सुरु होता. त्यामुळे जिल्ह्यातील रागरिकांची आर्थिक लूट होण्याबरोबरच असंख्य कुटुंबं देशोधडीला लागली आहेत. तर, अनेक कुटुंब उद्धस्त होण्याची भीतीदेखील वर्तविण्यात येत आहे. याबाबत आवाज उठवून ही बाब पोलीस यंत्रणेच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या घटनेचे गांभीर्य ओळखून स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांना कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार, तीन अधिकारी व १८ पोलीस कर्मचारी यांची वेगवेगळी सात पथके तयार करण्यात आली. खाडे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने काम सुरु केले. अलिबाग, पोयनाड, पेण याठिकाणी छापे टाकण्यात आले. अलिबाग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सहा ठिकाणी मटका सहा खेळत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार कारवाई करण्यात आली. रमेश चव्हाण, महेश पाटील, रवींद्र इंगोले, रुपेश

मटका व्हॉट्सअ‍ॅपवर

✻ रायगड जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका सुरू असून, तो ऑनलाईन झाला आहे. 'व्हाट्सअ‍ॅप'वरून चिठ्ठी देण्यात येते. आकड्यात मिळणारी रक्कम सिंगल आकळ्धासाठी १ स्पपाला ९ रुपये, जोड आकडपासाठी १ स्पवाला १० रुपये, चौकड्यासाठी १ व्यथाला एक हजार रुपये, जुगाराच्या धंद्यात राजकीय ✻ बदहस्तामुळे कारवाई करूनदेखील जुगार चालवणाऱ्यांना सोडून द्यावे लागते, अशी चर्चा होताना दिसते. मोरे, गोरख कडवे, कृष्णकांत पाटील, पंढरीनाथ म्हात्रे, परेश म्हात्रे, भावेश म्हात्रे, साहील सहानी, सुयेश पाटील, मिलिंद म्हात्रे, सुजीत म्हात्रे, कृष्णा म्हात्रे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्यांच्याकडून मटका जुगार खेळण्याचे साहित्य व रोख रक्कम जप्त केली. त्यानंतर पोयनाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अड्ड्यांवर छापा टाकून राजेश कदम, प्रकाश मोकल यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पेण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कारवाईत विनोद देशमुख यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या कारवाईने मटका जुगार चालविणाऱ्या १६ जणांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईने अवैध धंदे चालविणाऱ्याऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



नांदेड – महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या नांदेड शहराध्यक्षपदी मुन्तजीबोद्दीन मुनीरोद्दीन दैनिक नांदेड टाईम्स उर्दू यांची निवड करण्यात आली आहे. शासकीय विश्रामगृह येथे बैठक घेऊन त्यांना निवडीची पत्र देताना राज्य सदस्य अभय कुमार दांडगे, नांदेड जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे, लक्ष्मीकांत मुळे, गुणवंत वीरकर यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.



**माजलगाव ।प्रतिनिधी**

**तालुक्यातील गुजरवाडी येथे शिवजन्मोत्सव २०२५ व अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आनंदऋषीजी नेत्रालय, अहमदनगर तसेच बळीराजा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी मोफत नेत्र तपासणी व अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले. या शिबिरामध्ये आनंदऋषीजी नेत्रालय व्हिजन सेंटर, माजलगाव येथील नेत्र रोग चिकित्सक डॉक्टरांनी परिसरातील जवळपास १०० गरजू रुग्णांची मोफत नेत्र तपासणी केली. लवकरच ज्यांना गरज असेल त्यांना या शिबिराच्या माध्यमातून मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी आनंदऋषीजी नेत्रालय, अहमदनगर या ठिकाणी पाठवण्यात येणार आहे. या शिबिराचे आयोजन समाजकार्यात नेहमीच अग्रेसर असणारे व शेती प्रश्नांचे अभ्यासक प्रा. बालासाहेब येवले यांनी केले होते. या उपक्रमाबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. या उपक्रमासाठी मौजे गुजरवाडी ग्रामस्थांची ही मोठ्या प्रमाणावर साथ लाभली.**

# एकाच्या अवयव दानाने ८ जणांना जीवदान मिळते –डॉ. राजेश सेठिया

## समृद्धी ग्रुपतर्फे अवयवदानाबाबत जनजागृती अभियान

डॉ आशिष तिवारी/जालना

अवयव दान हे समाजासाठी एक अमूल्य योगदान आहे. आपणही अवयव दानाचा संकल्प करून कोणाच्यातरी आयुष्यात प्रकाश आणू शकतो. मेंदूमृत झालेल्या एका व्यक्तीचे हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुसे, आतडे आणि स्वादुपिंड, मूत्रपिंड यांसारखे अवयव गरजू रुग्णांना प्रत्यारोपणासाठी दिल्याने ८ जणांना जीवदान मिळते. शिवाय ७५ जणांचे जीवनमान अप्रत्यक्षरीत्या सुधरू शकते. मृत्यूनंतरही कोणाला नवा जन्म देण्याची संधी आपल्या हाती आहे. हे कार्य अत्यंत पवित्र आणि मानवतेला सहाय्य करणारे असल्याने व्यापक प्रमाणात जनजागृती होऊन अवयवदान लोकचळवळ बनली पाहिजे, अशी प्रतिपादन रुबी हॉस्पिटलचे संचालक व मधुमेहतज्ञ डॉ. राजेश सेठिया यांनी येथे बोलताना केले.

येथील समृद्धी ग्रुपच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकातील गुरु गणेश मंगल कार्यालयात २१ फेब्रुवारी रोजी अवयव दानाचे महत्त्व या विषयावर आयोजित जनजागृतीपर व्याख्यानात डॉ. सेठिया बोलत होते. व्यासपीठावर समृद्धी ग्रुपच्या अध्यक्ष स्वाती मांडोत, सचिव सुरेखा श्रीश्रीमाल, कोषाध्यक्ष संगीता खिवंसरा, सल्लागार तथा प्रकल्प प्रमुख पुनम सुराणा, सहप्रकल्प प्रमुख डॉ. उमा गादिया गादिया, राणी कुचेरिया, प्रीती खिवंसरा, मनीषा काठेड यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. सेठिया म्हणाले की, भारतात १९४८ मध्ये पहिले अवयव दान झाले. नेत्रतज्ञ डॉ. आरईएस मुथ्यया यांनी सर्वप्रथम नेत्र प्रत्यारोपण केले. पहिले हृदयरोपण ३ ऑगस्ट १९९८ रोजी एम्सचे डॉ. वेणूगोपाल आणि त्यांच्या टीमने देवीराम या व्यक्तीवर केले. त्यानंतर हा व्यक्ती २१ वर्षे जिवंत राहिला. त्यामुळेच भारतात ३ ऑगस्ट हा अवयव दान दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षीच्या अवयव दान दिनाची थीम इतरांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचे कारण तुम्ही बनवू शकता ही होती. भारतात पहिले यकृत दान ललिता रघुराम या २८ वर्षीय पत्नीने आपल्या पतीसाठी केले आणि या दोघांचा संसार सुखी बनला. यावर आधारित ये जिंदगी हा चित्रपट निघालेला आहे, अशी माहिती देऊन डॉ.सेठिया म्हणाले की, कोणत्याही वयात अवयव दान करता येते. १०० मिनिटे वयाच्या जन्मजात बालकाचे आणि ९५ वर्षीय व्यक्तीचे किडनी दान, १०७ वर्ष व्यक्तीचे नेत्रदान आणि इतरांवर प्रत्यारोपण यशस्वी झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. दुर्धर आजार असलातरी अशा व्यक्तींचे अवयव दान वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाच्या कामी येऊ शकते. संशोधन झाले तरच विज्ञान पुढे सरकेल. त्यामुळे अवयव दान चळवळ सुरू राहिली पाहिजे, असे ते म्हणाले. प्रत्येकवर्षी प्रत्यारोपणासाठी दीड ते दोन लाख किडनींची मागणी असते. प्रत्यक्षात मात्र चार टक्के किडनी दान होते. यकृताची मागणी ८० हजार असताना फक्त १८०० उपलब्ध होते. केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या सन २०२१च्या अहवालानुसार दरवर्षी रस्ते अपघातात दीड लाख लोक मृत्युमुखी पडतात. त्यातून फक्त ५५० जणांचे अवयव दान होते. मागणीच्या तुलनेत अत्यंत कमी अवयदान होत असल्याने गरजूंना प्राणास मुकावे लागते. अवयदानाचे सर्वाधिक प्रमाण स्पेनमध्ये आहे. तेथे १ कोटी मागे ३५०, अमेरिकेत २१९, इंग्लंडमध्ये १५० तर भारतात एक कोटी मागे फक्त ६ याप्रमाणे अवयव दानाचे प्रमाण आहे. आपण मृत्यू पश्चात अवयवदानाच्या माध्यमातून गरजूंना जीवनदान देऊ शकतो. त्यासाठी केंद्र सरकारच्या आरोग्य परिवार कल्याण मंत्रालयांतर्गत नोटो तर राज्य सरकारच्या सोटो आणि इतर अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अथवा ऑफलाइन अवयव दान संकल्पपत्र भरून देता येते. आपला एक संकल्प आठ ते दहा जणांना जीवनदान देऊ शकतो, अनेकांचे जीवन सुधरू शकतो, अशी साद डॉ. राजेश सेठिया यांना घेतली आणि या चळवळीसाठी समृद्धी ग्रुपला आपली सदैव साथ राहील, अशी ग्वाही दिली.

प्रास्ताविकपर भाषणात स्वाती मांडोत म्हणाल्या की, महिलांनी घराबाहेर पडून काहीतरी करावे, आपल्यातील कर्तृत्व दाखवावे यासाठी, ६० महिलांचा समृद्धी ग्रुप स्थापन करून विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. अवयवदान जनजागृती हा पहिला आरोग्यविषयक उपक्रम आम्ही हाती घेतला असून, त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमावर विशेष भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राणी कुचेरिया यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. उमा गादिया यांनी मानले.

# शिवसेनेत आउटगोइंग नंतर पुन्हा मोठे इन्कमिंग; किरण काळे यांचा शिवसेनेत प्रवेश

अहिल्यानगर ।प्रशांत बाफना

शहर काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष, आक्रमक नेते किरण काळे यांचा ठाकरेंच्या शिवसेनेते प्रवेश होणार अशी गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा होती. अखेर शनिवारी रात्री काळे आपल्या शेकडो समर्थकांसह पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मातोश्री येथे प्रवेश करण्यासाठी मुंबईकडे रवाना झाले आहेत.

प्रवेशाला रवाना होण्यापूर्वी काळे यांनी कार्यकर्त्यांसह छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या पुतळ्यांना अभिवादन केले. शहराचे ग्रामदैवत विशाल गणपतीचे दर्शन घेतले. हिंदू धर्मरक्षक स्व. अनिलभैय्या राठोड यांच्या शिवालय येथील प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत नतमस्तक होत अभिवादन केले. यावेळी कोण आला रे, कोण आला, शिवसेनेचा वाघ आला, अमर रहे अमर रहे, स्व. अनिलभैय्या अमर रहे, किरणभाऊ काळे आप आगे बढो, हम तुम्हारे साथ है या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, ज्येष्ठ शिवसैनिक रेवजी नांगरे, डॉ. श्रीकांत चेमटे, मनोज चौहान, किरण बोरुडे, दिलदार सिंग बीर, शिक्षक सेनेचे जिल्हाप्रमुख अंबादास शिंदे सर, जेम्स अल्हाट, विलास उबाळे आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, शंकर आव्हाड, किशोर कोतकर, सुरज ठोकळ आदींसह शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक हे देखील काळे यांच्या समवेत मुंबईकडे रवाना झाले आहेत.

शिवसेनेत आउटगोइंग नंतर पुन्हा मोठे इन्कमिंगदरम्यान, शहर शिवसेना उबाठा पक्षाच्या नगरसेवकांनी शिंदेंच्या शिवसेनेत काही दिवसांपूर्वी प्रवेश केल्यामुळे शहर शिवसेनेत आउटगोइंग झाले होते. मात्र किरण काळे हे ठाकरेंच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांसह रविवारी दुपारी प्रवेश करणार असल्यामुळे शिवसेना उबाठात मोठे इन्कमिंग झाले आहे. त्यामुळे शिवसेना उबाठामध्ये चैतन्यमय वातावरण निर्माण झाले आहे.



मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील राठोड सर यांचे जिजाई इंग्लिश स्कूल येथील परीक्षा केंद्रावर श्रेया इंटलिजंट अकॅडमी सर्च परिक्षा २०२५ (आय.ए.एस.) दि.२३ फेब्रुवारी रविवारी सकाळी ११ ते २ या वेळेत परीक्षा शांततेत घेण्यात आले या परीक्षेत १२५ विद्यार्थी बसले होते त्यापैकी १२३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिले तर २ विद्यार्थी अनुपस्थित होते. येथील जि.प.हा.शाळेतील, जिजाई इंग्लिश स्कूलचे, कै.शि. मळगे शाळा,वंळकी,देगाव,भोसले शाळा, सरस्वती इंग्लिश स्कूल, या सर्व शाळेतील विद्यार्थी इयत्ता १ली ते ७वी चे विद्यार्थी परीक्षा दिले केंद्र प्रमुख म्हणून जिजाई इंग्लिश स्कूलचे चे संचालक जी.आर. राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा घेण्यात आली पर्यवेक्षक म्हणून पी.जी .मिरगुडे , बिरादार मॅडम , प्रतिक्षा मॅडम , होमकर मॅडम , आर .एस .सोळनर ,पांचाळ मॅडम , खेंगटे मॅडम , शेळके मॅडम , सोनावणे मॅडम यांनी परिक्षेसाठी परिश्रम घेतले

# शासकीय नर्सिंग महाविद्यालय बीड येथे योगतज्ञ श्रीमती डॉ. राधा तांबे यांचे योग साधना शिबिर संपन्न

नार्यस्तु राष्ट्रस्य श्वः अर्थात नारी ही उज्वल राष्ट्राचे भविष्य आहे. प्राचीन हडप्पाकालीन संस्कृती पासून ते आजच्या आधुनिक युगापर्यंत नारीने समाजाला आणि देशाला नवी आशा आणि दिशा देण्याची काम केले आहे. प्राचीन हडप्पा संस्कृती स्त्रीप्रधान संस्कृती होती, यावरूनच आपल्याला महिलांचे महत्त्व अर्थसत्ता आणि राजसत्ता मध्ये किती महत्त्वाचा आहे हे दिसून येते. गेले कित्येक दिवस रथसप्तमी निमित्त राज्यभरामध्ये ठिकठिकाणी सूर्यनमस्कार स्पर्धाचे आयोजन होत आहे, त्या ठिकाणी मला योगतज्ञ व योग मार्गदर्शक या नात्याने उपस्थित राहण्यास मिळत आहे. मात्र या सर्वांमध्ये शासकीय नर्सिंग महाविद्यालयामध्ये गेले दहा दिवस चाललेल्या योग साधना शिबिरचा अनुभव खूप अनोखा आहे ,यामध्ये सुमारे २०० मुला-मुलींनी संपूर्ण १० दिवस उपस्थित राहून योग मधे दाखवलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल अत्यंत सकारात्मक अनुभव आला.



समाजाची सेवा करणाऱ्या या भावी परिचार्या असणाऱ्या मुली रुग्णांची सेवा करण्यात स्वतःचे आयुष्य झिजवतात. मात्र स्वतःला पाहिजे तेवढा वेळ आणि लक्ष देता येत नाही, त्यामुळे समाजाची सेवा करत स्वतः देखील कसे सक्षम राहता येईल यासाठी नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ सुवर्ण बेद्रे मॅडम आणि आयुष विभागाचे डॉ.लिंबकर यांनी मुलींसाठी दहा दिवसाचे योग साधना शिबिर आयोजित करण्याचे निर्णय घेतला. त्यामध्ये अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, अगदी पहिल्या दिवसापासून ते समारोप सोहळ्यापर्यंत सर्वांच्या मनामध्ये इतकाच उत्साह दिसून आला जो क्वचित अनुभवास येतो. योग क्षेत्रात मी अनेक शिबिरे आयोजित केली,मात्र या शिबिरामध्ये मुलींनी दाखवलेला प्रतिसाद अद्भुतपूर्वक आणि आनंददायक होता. शास्त्रशुद्ध पद्धतीने योगा सूर्यनमस्कार कसा करता येईल याचे बेसिक पासून डव्हान्स योगासने, प्राणायाम, योग निद्रा याचेमार्गदर्शनवप्रशिक्षणदेण्यातआले. मुलींची योगाची रुची पाहून अजून जास्त शास्त्रशुद्ध पद्धतीने योग शिकवण्यात तितकाच आनंद मनाला होत होता. पुरुषाला घराचा उंबरठा ओलांडताना फक्त कुटुंबाचा विचार करावा लागतो, मात्र स्त्रीला घराचा उंबरठा ओलांडताना वाईट नजरेआड लपलेल्या जगाचा विचार करावा लागतो. या योग सत्रमध्ये शहरातल्या च नाही तर आजूबाजूच्या गावातून मुली पहाटेच्या अंधारात देखील न चुकवता योगशिबिरात उपस्थित राहत होत्या हे आवर्जून स्मरणात राहण्या जोगे आहे.म्हणूनच सुरुवातच

नार्यस्तु राष्ट्रस्य श्वः या संस्कृत श्लोकाने केली. शासकीय नर्सिंग कॉलेजने आयोजित केलेल्या या योग साधना शिबिर उपक्रमाबद्दल प्राचार्य डॉ. सुवर्णा बेद्रे मॅडम उपप्राचार्य मोहिते मॅडम यांचे मनापासून धन्यवाद असे उपक्रम नक्कीच युवकांना पिढीला आणि राष्ट्राला पुढे नेण्यात मदत करतात हे निःसंशय आहे.



अंगणवाडीत शिवजयंती साजरी

बीड : तालुक्यातील चौसाळा येथील अंगणवाडी क्रमांक २ व ४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अंगणवाडी सेविका सुनीता काळे, जाकिरा मुजावर, मदतनीस संगीता निनाळे, हिराबाई गाडेकर, महिला पालक, बालक उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.